मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१४ ■ बुधवार, १५ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

■ जागतिक अर्थव्यवस्थेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही कालसुसंगत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन





**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

दादर येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापौर रितू तावडे उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीतही डॉ. आंबेडकर अग्रणी होते. महिलांना शिक्षण, संपत्ती आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या योगदानामुळेच भारत प्रजासत्ताक झाल्यापासून महिलांना समान मतदानाचा अधिकार मिळाला. महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होत असून, या निमित्ताने जातीयतेपासून मुक्त आणि भेदभावविरहित समाज घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

**जागतिक अर्थव्यवस्थेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही कालसुसंगत – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य याविषयीचे विचार आजही कालसुसंगत आहेत. जागतिक पातळीवर अर्थकारणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधिक असल्याचे सांगून जागतिक अर्थव्यवस्थेतही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील त्यांच्या संशोधनातून डॉ. आंबेडकरांनी भारतात केंद्रीय बँकेची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या विचारांवर आधारितच पुढे 'रिझर्व बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. तसेच 'गोल्ड स्टँडर्ड' आणि चलनाच्या खरेदी शक्तीबाबत त्यांनी मांडलेले विचार आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही मोलाचे ठरत आहेत. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स ऑफ रुपी' या प्रबंधातून रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा पाया रचला गेला. १९२३ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांच्या आधारावरच आज जग वाटचाल करत आहे. त्यांच्या प्रबंधात मांडलेल्या तत्त्वांवरच भारताची अर्थव्यवस्था उभी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर माणुसकीचे शिल्पकार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हाच आपला राष्ट्रधर्म असून बाबासाहेब हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून माणुसकीचेही शिल्पकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील शेवटच्या माणसालाही न्याय आणि सन्मान मिळण्याचा मार्ग सुकर झाला, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महापुरुष शांततेतून जेव्हा कृती करतात, तेव्हा ती क्रांती ठरते. महाड चवदार तळे सत्याग्रहातून समाजात आत्मसन्मानाची जाणीव निर्माण झाली. बाबासाहेबांनी आयुष्यभर शोषित, दलित आणि वंचित घटकांसाठी काम करून त्यांना सक्षम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारताची लोकशाही जगात भक्कमपणे उभी आहे. इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम वेगाने सुरू असून हे स्मारक पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## रुस्तमपूरात भीमजयंती उत्साहात: न्यू पंचशील बौद्ध मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे, तालुका प्रतिनिधी, दर्यापूर :** विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त न्यू पंचशील बौद्ध मंडळ, रुस्तमपूर येथे आज सकाळी प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मा. सौ. सुषमाताई खडे होत्या. यावेळी उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर, ग्रामपंचायत सदस्य राजुभाऊ चव्हाण, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रमोद जाधव सर, सहाय्यक शिक्षिका श्रीमती योगिता आवारे मॅडम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविभाऊ तायडे, अंगणवाडी सेविका श्रीमती शशिकला तायडे यांच्यासह पंचशील बौद्ध मंडळाचे पदाधिकारी व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी 'जय भीम' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

सरपंच सौ. सुषमाताई खडे म्हणाल्या, "बाबासाहेबांनी स्त्रियांना शिक्षणाचा आणि सन्मानाचा हक्क मिळवून दिला. आज मी सरपंच म्हणून तुमच्यासमोर उभी आहे, ते फक्त संविधानामुळे. गावातील प्रत्येक मुलीने शिकले पाहिजे, हेच बाबासाहेबांचे स्वप्न आपण पूर्ण करूया."

उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर यांनी सांगितले, "पंचशील मंडळाच्या माध्यमातून गावात प्रबोधनाचे काम सुरू आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश घरोघरी पोहोचवू." मुख्याध्यापक प्रमोद जाधव सर यांनी, "शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला बाबासाहेबांचा संघर्ष पाठ असला पाहिजे. कारण पुस्तक हेच आपले खरे शस्त्र आहे," असे प्रतिपादन केले.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविभाऊ तायडे यांनी मंडळाच्या सामाजिक कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक शिक्षिका योगिता आवारे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सदस्य राजुभाऊ चव्हाण यांनी मानले.

बौद्ध उपासक-उपासिकांनी सामूहिक त्रिशरण-पंचशील ग्रहण केले. अंगणवाडी सेविका शशिकला तायडे यांनी उपस्थित मुलांना खाऊ वाटप केले.

सामाजिक ऐक्य आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे रुस्तमपूर गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. न्यू पंचशील बौद्ध मंडळ, रुस्तमपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना सरपंच सौ. सुषमाताई खडे, उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर, मुख्याध्यापक प्रमोद जाधव सर व इतर मान्यवर. उपस्थित होते.

## दीक्षाभूमी येथे सामाजिक समता सप्ताहाचा भव्य समारोप

### 'घर घर संविधान' अभियानातून प्रस्ताविकेचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे /विदर्भ संपादिका** : महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऑडिटोरियममध्ये आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात मान्यवर, अधिकारी व नागरिक उपस्थित होते. 'घर घर संविधान' या अभियानांतर्गत भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वितरण करण्यात आले. तसेच विविध लोककल्याणकारी योजनांच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी शेतकरी स्वाभिमान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शेतजमिनीच्या सातबारांचे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत धनादेश वितरण, रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुलांचे वाटप तसेच जात वैधता प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. याचप्रसंगी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजरचना घडविण्याचा दृढ संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार मायाताई इवनाते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे तसेच इतर मान्यवर, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवेकानंद विद्यालयात डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ( दिनांक १४ एप्रिल) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रागिणी जकाते, अनिल कौसडीकर, गजानन साळवे, विनोद मंडलिक, विजय चौधरी, अश्विनी पावसे, दिपाली रोहिणकर, अमोल गायकवाड, शारदा पुरी, काशिनाथ पांचाळ, चेतन नाईक यांची उपस्थिती होती.

## आदिवासी विकासाचा भक्कम पाया आणि श्रेयावरून सुरू झालेली कुजबुज

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवणारे माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे यांचे कार्य पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. सोशल मीडियापासून ते विविध आदिवासी संघटनांपर्यंत त्यांच्या कामाची चर्चा रंगत असून, 'ट्रायबल फोरम महाराष्ट्र'ने त्यांच्या योगदानाचा गौरव करत कृतज्ञता व्यक्त केली आहे.डॉ. धुर्वे यांनी आपल्या कार्यकाळात केवळ आश्वासनांची भाषा न वापरता प्रत्यक्ष कामांवर भर दिला. पेसा क्षेत्रातील रखडलेली भरती प्रक्रिया सुरू करून हजारो तरुणांसाठी रोजगाराचे दरवाजे उघडले. पेसा क्षेत्राची पुनर्रचना, १२,५२० पदांची महाभरती आणि पोलीस भरतीत आदिवासी युवकांना उंचीमध्ये सवलत मिळवून देणे, या निर्णयांमुळे अनेकांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली.शिक्षण क्षेत्रातही त्यांनी ठोस पावले उचलली. राज्यभरात २८४ वसतिगृहांचा आराखडा मंजूर करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय निर्माण केली, तर पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फेलोशिप उपलब्ध करून उच्च शिक्षणालाही चालना दिली.कोरोनासारख्या कठीण काळात त्यांनी ११ लाख ५५ हजार आदिवासी कुटुंबांपर्यंत 'खावटी'च्या माध्यमातून मदत पोहोचवली. केवळ योजना जाहीर न करता त्या लोकांपर्यंत पोहोचवण्याची त्यांची कार्यपद्धती यावेळी विशेष ठळकपणे दिसून आली. अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र आयोगाच्या स्थापनेसाठी त्यांनी केलेला पाठपुरावाही महत्त्वाचा मानला जातो. पांढरकवडा येथे 'जंगोआई' स्थापन करण्यासाठी वनविभागाकडून जागा मिळवून देणे, त्यासाठी ३० लाखांचा निधी उपलब्ध करून देणे आणि पुढे ४ लाईट पोल उभारून त्या ठिकाणी मूलभूत सुविधा निर्माण करणे—या कामांमुळे स्थानिक पातळीवर विकासाची नवी ओळख तयार झाली आहे.दरम्यान, त्यांच्या कार्यकाळात उभारण्यात आलेली वसतिगृहे, आश्रमशाळा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या इमारती आणि ७० हून अधिक समाजमंदिरे आजही त्यांच्या कामाची साक्ष देत उभी आहेत. तब्बल २००० कोटींचा निधी आणून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या या नेतृत्वाची कामे आजही लोकांच्या चर्चेचा विषय आहेत.सध्या या कामांचे लोकार्पण आणि श्रेय घेण्याच्या हालचाली काही ठिकाणी दिसत असल्या, तरी "काम कोणाचे आणि नाव कोणाचे" हा प्रश्न समाजात शांतपणे चर्चिला जात आहे. ज्यांनी पाया घातला त्यांची जाणीव समाजाला आहे, आणि म्हणूनच या चर्चेला अधिक धार येताना दिसत आहे.'ट्रायबल फोरम'चे प्रमोद घोडाम यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, डॉ. धुर्वे यांनी प्रत्येक प्रश्न सभागृहात मांडून तो मार्गी लावला. त्यांच्या कामामुळेच आज समाजाला न्याय मिळत आहे. तसेच विलास जुमनाके यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करत, समाज त्यांच्या त्यागाची जाणीव कधीही विसरणार नाही, असे मत व्यक्त केले. आज आदिवासी समाजात एक भावना स्पष्टपणे उमटताना दिसते—जिथे नेतृत्व कामातून दिसते, तिथे प्रचाराची गरज भासत नाही. आणि म्हणूनच डॉ. संदीप धुर्वे यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता समाजकारणाचा आदर्श ठरत

## श्रीवर्धन भाजपमध्ये खळबळ : शहराध्यक्ष लक्ष्मण हरिश्चंद्र पावशे यांचा राजीनामा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी घटना घडली असून, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष लक्ष्मण हरिश्चंद्र पावशे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या तब्बल १७ वर्षांपासून पक्षासाठी निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करूनही दिलेले आश्वासन पूर्ण न झाल्याने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे समजते.

श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीनंतर त्यांना २ वर्षांसाठी स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देण्याचे आश्वासन पक्षाकडून देण्यात आले होते. मात्र, दीर्घ कालावधी लोटूनही हे आश्वासन पूर्ण करण्यात आले नाही. त्यामुळे पक्षाच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करत पावशे यांनी अखेर राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

पक्षासाठी सातत्याने कार्यरत राहूनही आपल्या कामाची दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे स्थानिक भाजप संघटनेत अस्वस्थता निर्माण झाली असून, याचे आगामी राजकारणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, पावशे यांच्या राजीनाम्यानंतर पक्षाकडून काय भूमिका घेतली जाणार आणि पुढील रणनीती काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पनवेलमध्ये महिला सक्षमीकरणाला गती देण्यासाठी सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांचा भक्कम पुढाकार

## प्रशिक्षण ते बाजारपेठपर्यंत संपूर्ण साखळी उभारण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी समिती सदस्यांसह महिलांच्या सर्वांगीण आर्थिक सक्षमीकरणासाठी एक व्यापक आणि धोरणात्मक प्रस्ताव महापौर व आयुक्त यांच्याकडे सादर केला.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर करून महिलांना स्वावलंबी, उद्योजक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा या प्रस्तावाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रस्तावामध्ये राष्ट्रीय शहरी आजीविका अभियान (NULM), राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (NRLM), प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया अभियान तसेच महाराष्ट्र शासनाच्या MAVIM धोरणांचा आधार घेत महिलांसाठी प्रशिक्षण, उत्पादन, विक्री व बाजारपेठ या संपूर्ण साखळीचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

विद्यमान परिस्थितीवर भाष्य

सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी नमूद केले की, महानगरपालिकेमार्फत महिला प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जात असली तरी प्रशिक्षणानंतर उत्पादन निर्मिती, गुणवत्ता नियंत्रण, ब्रँडिंग व विक्री व्यवस्थापन या टप्प्यांमध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत.

यामुळे महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळत नाही आणि अपेक्षित आर्थिक सक्षमीकरण पूर्णत्वास जात नाही.

या पार्श्वभूमीवर महिलांना "प्रशिक्षण ते थेट ग्राहक" असा सक्षम मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी खालील ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

प्रमुख मागण्या व उपाययोजना :

१) महिला उत्पादित वस्तूंसाठी अधिकृत विक्री स्टॉल उपलब्ध करणे :

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील उद्यानांच्या बाहेरील अनधिकृत टपऱ्या हटवून संबंधित प्रभागातील महिला व महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थ व इतर उत्पादनांच्या विक्रीसाठी अधिकृत स्टॉल उपलब्ध करून देण्यात यावेत.



यामुळे महिलांना थेट ग्राहक मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

२) प्रभागनिहाय महिला आठवडा बाजार सुरू करणे :

महानगरपालिका व सिडकोच्या आरक्षित जागांवर नियमित आठवडा बाजार आयोजित करून त्यामध्ये महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करून द्यावेत.

यामुळे महिलांच्या उत्पादनांना स्थिर, नियमित आणि विश्वासार्ह बाजारपेठ उपलब्ध होईल.

३) कौशल्य विकास, प्रशिक्षण व उत्पादन सुविधा उपलब्ध करणे :

महिलांना विविध प्रकारची उत्पादने तयार करण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करण्यासाठी नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत.

तसेच प्रशिक्षणानंतर उत्पादनांची प्रत्यक्ष निर्मिती करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री, यंत्रणा व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४) कायमस्वरूपी व्यापारी ग्राहक पेठ उभारणे :

महिला व महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी वर्षभर चालणारी कायमस्वरूपी व्यापारी ग्राहक पेठ उभारण्यात यावी.

यामुळे महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी स्वतःचे स्थायी विक्री व्यासपीठ मिळेल व मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल.

भाजप विचारधारेचा ठसा

या प्रस्तावामध्ये भारतीय जनता पक्षाच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणांना अनुसरून "आर्थिक स्वावलंबन हीच खरी सबलीकरणाची किल्ली" या विचाराला प्राधान्य देण्यात आले आहे.

**निष्कर्ष व मागणी**

वरील सर्व उपाययोजना शासन निर्णयांच्या अनुषंगाने तातडीने राबविल्यास पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती व आर्थिक सक्षमीकरण साध्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.सदर प्रस्तावाची तातडीने दखल घेऊन प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी महिला बालकल्याण समिती सदस्यांसोबत प्रशासनाकडे केली आहे.

**"भारतीय जनता पक्षाच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या तत्वज्ञानातून महिला सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे. महिलांना केवळ प्रशिक्षण देणे पुरेसे नाही, तर त्यांना बाजारपेठ, संधी आणि आर्थिक बळ देणे अत्यावश्यक आहे. पनवेलमध्ये महिलांसाठी सक्षम आर्थिक परिसंस्था उभारण्यासाठी हा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा आणि दूरदृष्टीपूर्ण आहे."**

**श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे**
**मा.विरोधी पक्ष नेते**
**पनवेल महानगरपालिका.**

## ग्रामपंचायत कार्यालय पारडगाव येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**रमेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर) :** पारडगाव ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य,बाबा सय्यद, रविंद्र ढेरे,राम ढेरे,ग्रामस्थ नाथा खरात,फकीरा पाखरे,भागवत ढेरे, विष्णू डोळझाके,शौकत भाई कुरेशी, नामदेव भालेकर,भीमा शेळके,




विलास आढाव, हरिश्चंद्र भारस्कर,विष्णू खरात, फिलिप नाटकर,आदीसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले. समाजातील सर्व घटकांनी शिक्षण,समता व बंधुता या त्यांच्या तत्वांचा अवलंब करावा,असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना संविधान मूल्यांची जाणीव करून देत सर्वांनी एकजुटीने समाज प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

## आईच्या स्मृतीतून सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी :बाळासाहेब रकटाटे** : आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जगातही काही कुटुंबे आपल्या कृतिशील विचारांनी समाजासमोर प्रेरणेचा दीप प्रज्वलित करतात. अशाच एका हृदयस्पर्शी आणि समाजोपयोगी उपक्रमाची नोंद आष्टी तालुक्यातील अंभोरा परिसरात घेण्यात आली आहे. कै. चंद्रकला बन्सी आमले यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या बांधकामासाठी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देत सामाजिक बांधिलकीचा सुंदर आदर्श निर्माण केला आहे.

कै. चंद्रकला आमले या साध्या, प्रेमळ आणि कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी केवळ दुःख व्यक्त न करता त्यांच्या स्मृती जपण्यासाठी समाजोपयोगी कार्य करण्याचा निर्णय घेतला. त्याच भावनेतून त्यांचे सुपुत्र चंद्रकांत बन्सी आमले तसेच पती बन्सी लक्ष्मण आमले यांच्या वतीने ही रक्कम शाळेला प्रदान करण्यात आली.

या उपक्रमामागे "आईच्या आठवणी जपताना समाजालाही काहीतरी देणे" ही उदात्त भावना आहे. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन मानून त्यांनी शाळेच्या बांधकामासाठी मदत केली आहे. ग्रामीण भागातील शाळांना अद्ययावत सुविधा मिळणे ही काळाची गरज आहे. अशा परिस्थितीत मिळालेली ही आर्थिक मदत शाळेच्या विकासासाठी मोलाची ठरणार आहे.

सदर निधीमुळे शाळेच्या बांधकामास गती मिळणार असून विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित, सुबक आणि सोयीस्कर शैक्षणिक वातावरण मिळण्यास मदत होणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध होणे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. या कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही समाजाप्रती कृतज्ञता आणि सेवा भावना निर्माण होण्यास हातभार लागणार आहे.

कै. चंद्रकला आमले यांच्या निधनाला सुमारे एक वर्ष पूर्ण होत असताना त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ केलेले हे कार्य केवळ श्रद्धांजली नसून, समाजासाठी एक प्रेरणादायी संदेश आहे. आज अनेकजण पुण्यस्मरण कार्यक्रम भव्य पद्धतीने साजरे करतात; मात्र त्या निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम राबवण्याची परंपरा फारच कमी प्रमाणात दिसून येते. आमले कुटुंबियांनी हा वेगळा आणि आदर्श मार्ग निवडत समाजासमोर एक सकारात्मक उदाहरण ठेवले आहे.

या उपक्रमाबद्दल परिसरात सर्व स्तरातून कौतुक व्यक्त होत आहे. ग्रामस्थ, पालकवर्ग तसेच शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी आमले कुटुंबियांच्या या कार्याचे स्वागत केले असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सामाजिक जाणीवा अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले आहे.

आईच्या प्रेमळ आठवणींना जपत शिक्षण क्षेत्राला हातभार लावण्याचा हा प्रयत्न निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. "श्रद्धांजली शब्दांत नव्हे, तर कृतीतून द्यावी" हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला आहे. अशा सामाजिक जाणिवा रुजल्या तर समाज अधिक सक्षम, संवेदनशील आणि प्रगतिशील होईल, यात शंका नाही.

## पाणी नाकारणाऱ्या व्यवस्थेलाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'पाणी' पाजले - डॉ. संजय गायकवाड

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ छत्रपती संभाजीनगर:-** "बालपणी शाळेत असताना भीमराव आंबेडकर यांना भेदभावपूर्ण वागणूक सहन करावी लागत होती. चपराशी वरून पाणी ओतून देत असे आणि तो अनुपस्थित असल्यास त्यांना पाणीही मिळत नसे. अशा अमानवी व्यवस्थेचा सामना करत, पुढे त्या व्यवस्थेलाच धडा शिकवत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परिवर्तनाचे पाणी पाजले," असे प्रभावी प्रतिपादन लेखक तथा व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी केले.




भक्तीनगर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, "डॉ. आंबेडकरांनी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांना गुरुस्थानी मानले; मात्र त्यांच्या जीवनमूल्यांची पायाभरणी त्यांच्या आई-वडिलांनीच केली. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात आलेल्या मार्गदर्शक व्यक्तींचे योगदानही अत्यंत महत्त्वाचे आहे."

मतदानाबाबत जागरूकतेचा संदेश देताना ते म्हणाले, "पैशासाठी मतदान करणारा मतदार हा लोकशाहीचा खरा घातक ठरतो . अशा प्रवृत्तीमुळेच बाबासाहेबांच्या विचारांना धक्का पोहोचतो. त्यामुळे आपण त्यांच्या विचारांचे मित्र व्हायचे की विरोधक, हे प्रत्येकाने ठरवावे."यावेळी मुख्याध्यापक रायभान जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भीमगीते सादर करून वातावरण भारावून टाकले, तसेच काही विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याशिवाय संगीत खुर्चीचा उपक्रमही आयोजित करण्यात आला होता. यावेळी भंतेजी दीपत, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. जमधडे, संजय शिरसाठ, आदित्य खरात, श्री. भांबळे, सदाशिव जाधव, श्री. तरटे, श्री. सुरडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त किनवट मध्ये ऐतिहासिक डिजीटल फलक अनावरण

**दैनिक युवक**

**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव** : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त युवा उद्योजक आणि VIP रीयल इस्टेट व VIP ऑफिस चे संचालक आशिष विठ्ठलराव शेळके यांच्या संकल्पनेतून व स्वखर्चातुन शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक नावाचे डिजिटल फलक जयंती समिती च्या आग्राहास्तव स्वतः आशिष शेळके यांच्या हस्ते अनावरण करुन एक ऐतिहासिक धम्मदान किनवट शहराला दिले आहे.

कित्येक वर्षांपासून किनवट शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळील परिसाराला आंबेडकर चौक या नावाने संबोधले जाते. परंतु आजपर्यंत तिथे अशा नावाचे कुठलेही




फलक, पाटी अथवा ते नाव कुठेही दर्शनी ठिकाणी नव्हते. हिच बाब जयंती समिती अध्यक्ष आकाश आळणे आणि सचिव प्रतिकेश ओंकार व सर्व समितीने आशिष शेळके यांना सांगितले, तर त्याच क्षणी आशिष शेळके यांनी हे फलक मी माझ्याकडुन सर्व स्वखर्चाने त्या नावाचे डिजिटल बोर्ड धम्मदान म्हणून देईल असे सांगितले. आणि फक्त सांगितलेच नाही तर अवघ्या आठ दिवसांत त्या नावाचे एक आकर्षक डिजीटल बोर्ड तयार करुन तिथे १४ एप्रिल रोजी लावण्यात ही आले.

आशिष शेळके यांच्या अशा या ऐतिहासिक धम्मदानाचे, तसेच आकर्षक अशा ऐतिहासिक डिजीटल फलक चे सर्वच स्तरांतून शब्द सुमनाने मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. सर्व समाजातील व्यक्ती ने याचा बोध घेऊन आपण समाजाचे काही तरी देणे लागतो या हेतुने आपण फुल न फुलाची पाकळी म्हणुन समाजासाठी काहीतरी धम्म दान दिले पाहिजे हे आशिष शेळके यांनी दाखवून दिले असे जनतेतून बोलल्या जात आहे.


## उरणच्या पिरवाडी किनाऱ्यावर ५ पर्यटकांची मृत्यूशी झुंज; सागर सुरक्षा रक्षकांमुळे टळला मोठा अनर्थ!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेला पिरवाडी किनारा पुन्हा एकदा एका थरारक घटनेमुळे चर्चेत आला आहे. सोमवारी संध्याकाळी समुद्रात फिरायला गेलेले पाच पर्यटक भरतीमुळे खडकांमध्ये अडकले होते. मात्र, सागर सुरक्षा रक्षकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या पाचही जणांचे प्राण वाचवण्यात यश आले आहे.

सोमवारी संध्याकाळी काही पर्यटक उत्साहाच्या भरात किनाऱ्यापासून लांब असलेल्या खडकांवर गेले होते. यावेळी समुद्राला भरती आल्याने पाण्याचा वेढा वाढला आणि हे पर्यटक मध्येच अडकून पडले. जीवाची भीती निर्माण झाल्याने पर्यटकांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. यावेळी तिथे तैनात असलेल्या सागर सुरक्षा रक्षकांनी कोणतीही वेळ न घालवता तातडीने धाव घेतली आणि पाचही पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

पिरवाडी किनाऱ्यावर वर्षभर पर्यटकांची मोठी गर्दी असते. येथे खाण्यापिण्याची आणि मनोरंजनाची उत्तम सोय असली, तरी प्रशासकीय उदासीनता स्पष्टपणे दिसून येत आहे. किनाऱ्यावर कुठेही धोक्याच्या सूचना देणारे फलक नसल्याने नवीन येणाऱ्या पर्यटकांना पाण्याचा आणि खडकांचा अंदाज येत नाही. अनेकदा उत्साहाच्या भरात पर्यटक खोल पाण्यात किंवा खडकांवर जातात आणि आपला जीव धोक्यात घालतात. पिरवाडी किनाऱ्यावर पर्यटकांना योग्य दिशा मिळावी आणि असे अपघात टाळण्यासाठी



प्रशासनाने तातडीने ठिकठिकाणी माहिती फलक आणि इशारा देणारे बोर्ड लावावेत, अशी मागणी स्थानिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे. सोमवारी झालेली ही केवळ सुरक्षा रक्षकांच्या तत्परतेमुळे सुदैवाने निभावले अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. ...

## मेरा युवा भारत' हिंगोली तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त निबंध स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी -हिंगोली** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून 'मेरा युवा भारत हिंगोली (महाराष्ट्र )' च्या वतीने जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

तरुणांच्या विचारांना व्यासपीठ

डॉ. बाबासाहेबांचे विचार, त्यांचे सामाजिक योगदान आणि आधुनिक भारताच्या उभारणीतील त्यांची भूमिका नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर: आधुनिक भारताचे शिल्पकार" आणि "संविधान आणि युवकांची जबाबदारी" अशा विविध विषयांवर स्पर्धकांनी आपले विचार मांडले.

उल्लेखनीय सहभाग

हिंगोली जिल्ह्यातील विविध महाविद्यालये आणि शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. अत्यंत प्रभावी आणि अभ्यासपूर्ण अशा निबंधांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून तरुणांच्या लेखन कौशल्याला आणि बौद्धिक विचारांना मोठी चालना मिळाली.

आयोजन आणि परीक्षक

'मेरा युवा भारत'हिंगोली च्या विजय खुडे यांनी या स्पर्धेचे नियोजन केले होते. आयोजकांनी सांगितले. डॉ. बाबासाहेबांच्या जयंती निमित्त अशा विधायक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# सामाजिक न्याय भवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**संविधान हा देशाच्या सुदृढ लोकशाहीचा पाया !! जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे प्रतिपादन**



**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : भारतीय संविधान हे देशाच्या एकता व अखंडतेचा पाया असून सक्षम व सुदृढ लोकशाही निर्माण करण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने ८ ते १४ एप्रिल दरम्यान आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय भवनात आयोजित सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमात त्या बोलत होत्या. समाजकल्याण सहाय्यक आयुक्त मारुती वाठ, जिल्हा जात पडताळणी उपआयुक्त अमोल यावलीकर, व्याख्यात्या राजेश्वरी सोळंके यांच्यासह सामाजिक न्याय विभाग पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थी आदी उपस्थित होते.

श्रीमती मीना म्हणाल्या की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अद्वितीय आहे. त्यांनी देशाला संपूर्ण जगाला आदर्शवत अशी राज्यघटना दिली. त्यांचे लेखनकार्य व विचार संपूर्ण भारतीयांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकाने वाटचाल केली पाहिजे. यावेळी इतर मान्यवरांचीही भाषणे झाली.यावेळी पात्र व्यक्तींना नियुक्तीपत्र जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात आले. विविध पुरस्कारांचे वितरणही यावेळी झाले. कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्यापूरमध्ये डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त ‘12 तास अभ्यास’ उपक्रमाचा शुभारंभ

## स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्ञानेश्वर काळे** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दर्यापूर येथे ‘स्पर्धा परीक्षा व 12 तास अभ्यास’ या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. खासदार बळवंत भाऊ वानखडे मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव इंजि. नितेश दादा वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. आंबेडकरांच्या ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या प्रेरणादायी विचारांना केंद्रस्थानी ठेवून हा उपक्रम राबविण्यात येत असून,



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम करण्याचा उद्देश यामागे आहे.

यावेळी गावंडे अभ्यासिका, समता कॉलनी दर्यापूरचे संचालक आनंद गावंडे सर, सौं. गावंडे मॅडम, ज्ञानेश्वर मेश्राम सर, दर्यापूर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष सागर भाऊ देशमुख, सचिन भाऊ धुवे, रत्नदीप वानखडे, रोहित धांडे, नरेंद्र इंगोले, दिनेश अघडते, जगदीश कांबे यांच्यासह अनेक मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा गौरव

कार्यक्रमादरम्यान घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.

प्रथम: गोकुळ वाघमारे (इंजि. नितेश वानखडे यांच्या हस्ते सन्मानित)

द्वितीय: सागर लबडे

तृतीय: अभिषेक खडे

विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना इंजि. नितेश वानखडे म्हणाले की, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेता, ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य दिशा व अभ्यासाचे वातावरण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. ‘12 तास अभ्यास’ ही शिस्तच विद्यार्थ्यांच्या यशाचा मजबूत पाया ठरेल.”

आनंद गावंडे सर यांनीही विद्यार्थ्यांना सातत्य, मेहनत आणि ध्येयवेडी वृत्ती यांचे महत्त्व पटवून दिले.दरम्यान, खासदार बळवंत भाऊ वानखडे मित्रपरिवाराच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक उपक्रम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# श्रीवर्धनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाजसुधारक आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती श्रीवर्धन शहरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



गावागावात विविध संघटनांच्या वतीने मिरवणुका काढण्यात आल्या. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांच्या जयघोषात वातावरण दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी दिलेला समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगण्यात आले. युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काही ठिकाणी रक्तदान शिबिर आणि शैक्षणिक साहित्य वाटप यांसारखे उपक्रम राबवण्यात आले.एकूणच, श्रीवर्धनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध पद्धतीने आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देत साजरी करण्यात आली.

# हणेगाव येथे क्रांतीसूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**.तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर(दि.१५) जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा कन्या हणेगाव येथे विश्वरत्न,प्रज्ञासूर्य,क्रांतीसूर्य,महामानव,युगपुरुष भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती देगलूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी सर,लोणी केंद्राचे केंद्रप्रमुख आनंद पांढरे सर यांच्या उपस्थितीत प्रसन्न आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली.याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी गोडाजी सरांनी विद्यार्थ्यांना अतिशय मार्मिक असे भारतरत्न भीमराव आंबेडकर यांच्या जीवन कार्याची माहिती दिली व डॉ.बाबासाहेब आबेडकर यांची जयंती भारतात नाही तर ६५ पेक्षा अधिक देशात साजरी केली



जाते,शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र जनतेला बाबासाहेबानी दिला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात सुमारे पाच हजार वर्षापासून प्रचलित असलेल्या जातीव्यवस्थेस खिंडार पडले तिचे उच्चाटन होण्यास चालना मिळाली विषमतेवर आधारलेल्या जाती व्यवस्थेच्या जागी समतेवर आधारलेली लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होण्यास चालना प्रेरणा मिळाली.त्यांच्या कार्यामुळे हजारो वर्षापासून उच्च जातीच्या गुलामगिरीत अडकून पडलेल्या अस्पृश्यामध्ये एकता जागृती निर्माण झाली व समतेची भावना सर्वांमध्ये रुचली आत्मविश्वास निर्माण झाला असून सर्व भारतीयांना शिक्षणाचे महत्त्व कळले.डॉ.बाबासाहेबांच्या कार्यामुळे सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक बाबी मध्ये भारतात खूप बदल झाला असून बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणालाही खूप महत्त्व दिले अशा अनेक विषयावर पांढरे सर व गोडाजी सरांनी प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले.याप्रसंगी कन्या शाळेचे मुख्याध्यापक कुंभार सर, बिरादार सर सोनवणे मॅडम पाटील मॅडम,बच्चेवार मॅडम इंदलगावे मॅडम आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) पनवेल प्रतिनिधी** : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त चांदवड या ठिकाणी होळकर वाडा रंगमहालात सहावे राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्कृष्ट नियोजनातून व देखण्या व्यवस्थापनातून पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन जत विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते व धनगर समाजाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर हस्ते आणि अनेक मान्यवरांचे उपस्थितीमध्ये व सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू





प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथदिंडीने आणि पारंपारिक धनगर वाद्यांच्या गजरात सुरुवात करण्यात आली. यावेळी अनेक विषयावर चर्चासत्रे, परिसंवाद, आणि काव्य संमेलनांनी मेजवानी दिल्याचे समजते. या कार्यक्रमाला खासदार रामराव वडकुते, आमदार राहुल आहेर, नगराध्यक्ष वैभव बागुल, अमरजीत राजे बारगळ, डॉ. अभिमन्यू टकले सद्गुरु श्री .श्री. साखर कारखाना लि .श्री. श्रीनगर राजेवाडीचे व्हाईस चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर पाटील, स्वागत अध्यक्ष शिवाजी ढेपले, बापूसाहेब शिंदे, डॉ हनुमंत कणेकर ,डॉ आर डी शेंडगे अशा अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यावेळी आमदार राहुल आहेर, खासदार रामराव वडकुते यांनीही मार्गदर्शन केले प्रास्ताविक अभिमन्यू टकले यांनी केले तर आभार डॉ. बाळासाहेब कर्णवर पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमामुळे धनगर समाजातील बालकांपासून युवकांपर्यंत ते युवकांपासून वृद्धांपर्यंत एक नवीन उत्साह निर्माण झाल्याचे दिसून आले.

# शिका संघटित व्हा, संघर्ष करा' आरकेएफ ज.ने. पोर्ट विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जागर!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आर. के. एफ. ज.ने. पोर्ट विद्यालयात अत्यंत चैतन्यमय आणि उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक नेते रमाकांत गावंड सर, पालक-शिक्षक



संघाचे उपाध्यक्ष केवल गावंड, उपाध्यक्षा अश्विनी पाटील, सहसचिव कामिनी पाटील, रवींद्र महाजन, संदेश ठाकूर, मनोहर डाकी आणि वनमाला कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. ज्येष्ठ शिक्षिका भारती कांबळे, सुमन पाटील, प्रेरणा कदम, मिलिंद ठाकूर, गणेश बंडा, वंदना कपूर, योगसाधना पाटील आणि सारिका तायडे यांनीही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.आदर्श कला शिक्षक मिलिंद ठाकूर यांनी उत्कृष्ट फलक लेखन आणि सूत्रसंचालन केले. शिक्षिका आश्रया शिवकर, योगसाधना पाटील व उज्वला तांडेल यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित 'प्रोजेक्ट'ची अत्यंत कल्पक मांडणी केली होती. ज्येष्ठ शिक्षिका भारती कांबळे यांनी 'बुद्ध वंदना' सादर केली, तर पंडित गणेश बंडा यांनी भीमगीतांच्या गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विणा न-हे, नमित वाघवले आणि सारिका गवळी तसेच उपस्थित मान्यवराने आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांनी दिलेला महामंत्रण आजच्या तरुण पिढीसाठी कसा मार्गदर्शक आहे हे वाक्याने प्रभावीपणे स्पष्ट केले कार्यक्रमानंतर शालेय परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी" भारत माता की जय", "डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो", "संविधानाचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

केवळ पुस्तकी ज्ञान देता महापुरुषांचे विचार आणि सामाजिक मूल्यांची रुजवणूक करण्यात आर के एफ जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय नेहमीच अग्रेसर राहिले आहे

मुख्याध्यापक रमाकांत गावंड सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी सर्वांनी महामानवाच्या प्रतिमे समोर नतमस्तक होऊन आदरांजली वाहिली. संविधाना प्रति निष्ठा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा सोहळा अतिशय सुंदर रित्या संपन्न झाला.

# तेजस्वी विकास संस्था; पोहडूळ संचलित हरितक्रांती येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** :भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तेजस्वी विकास संस्था पोहडूळ संचलित हरितक्रांती जल व भूमी परिक्षण प्रयोगशाळा मानवत येथे आज दिनांक १४ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख उपस्थिती रहुवीर नाईक( मंडळ अधिकारी मानवत) हरितक्रांती जल व भूमी परिक्षण प्रयोगशाळा प्रमुख टी एम बालटकर सुरज तांदळे (सहाय्यक कृषी अधिकारी हमदापुर) अविनाश बालटकर मोनिका भुते सुजाता तारे अस्मिता समिद्रे यांच्या सह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मुदखेडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी /योगेश चौदंते** : आज दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी मुदखेड शहरात महामानव, बोधिसत्व, परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने शहरातील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे सदस्य, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमादरम्यान पंचशील



ध्वज व निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून समाजात समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प केला.शहरात विविध ठिकाणी जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चात मोठ्या सख्येने सहभागी व्हा.:- राहुल जाधव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):-** मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असून,येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम महाएल्गार आरक्षण मोर्चात सर्व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तसेच सर्वच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी केले आहे. या



वेळी बोलताना राहुल जाधव म्हणाले की, हा मोर्चा मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आयोजन करण्यात आले आहे.हा मोर्चा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त मागणी आहे. समाजातील अनेक तरुण आज ही संधी अभावी मागे राहत आहेत. त्या मुळे आपल्या मुला-बाळांच्या जीवन उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, सर्व काँग्रेस विचार धारेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मुस्लिम समाजा सोबत एकजुटीने उभे राहिला पाहिजे असे काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी सांगितले आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय पारडगाव येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** पारडगाव ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य,बाबा सय्यद, रविंद्र ढेरे,राम ढेरे,ग्रामस्थ नाथा खरात,फकीरा पाखरे,भागवत ढेरे, विष्णू डोळझाके,शौकत भाई कुरेशी, नामदेव भालेकर,भीमा शेळके, विलास आढाव, हरिश्चंद्र भारस्कर,विष्णू खरात, फिलिप नाटकर,आदीसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले. समाजातील सर्व घटकांनी शिक्षण,समता व बंधुता या त्यांच्या तत्वांचा अवलंब करावा,असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना संविधान मूल्यांची जाणीव करून देत सर्वांनी एकजुटीने समाज प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

## गाडीची काच फोडुन आतील मौल्यवान दागीने व रोख रक्कम चोरणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : उभ्या गाडीची काच फोडुन आतील मौल्यवान दागीने व रोख रक्कम चोरणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून मौल्यवान दागिन्यासह रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी वाहन हस्तगत केले आहे .



पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील गो ग्रिन हॉटेल, कल्ले गाव या हॉटेलचे पार्कीगमध्ये फिर्यादी यांनी पार्क करुन ठेवलेल्या फॉर्च्यूनर कार चे डाव्या बाजुची पाठीमागील काच फोडुन गाडीतील पर्सची व पर्समधील एकूण ८,४८,५००/- रु.. किमतीचे दागीने व रोख रक्कम चोरी केली असून सदर बाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. याबाबत पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांनी अधिक शोध घेण्या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा सतिष तांडेल, पोहवा शिवाजी बाबर, पोहवा भुषण म्हारसे, पोशि आकाश भगत याना मार्गदर्शन केले. त्यानुसार सदर गुन्हयाचा करण्यात आलेला तांत्रीक तपास व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा सतिष तांडेल व पोहवा शिवाजी बाबर यांचे पथकाने इंडी, जि. विजापूर, कर्नाटक येथे जावून सापळा रचून सदर गुन्हा करणारे आरोपीत नामे शेरा सुरेश चव्हाण, वय ४१ वर्षे, रा. शिरढोण, म्हाडा, बी-४, रुम क्र. १०३, पहिला माळा, खोणी पलावा, मानपाडा, डोंबिवली.. जि. ठाणे मु.रा. नवपुरा गाव, पो. बोगना, मर्दा थाना, जि. काझीपुर, उत्तरप्रदेश व विनोद उर्फ लंगडा अशोक पवार, वय ४३ वर्षे, रा. अंबुजवाडी, लक्ष्मी चाळ, मालवणी, मालाड, मुंबई मुळ रा. आंजुर्गी, ता. जि. विजापूर, राज्य कर्नाटक यांना ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. सदर दोन्ही आरोपीत यांना मा. न्यायालयाने दि. १६/०४/२०२६ रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली असून पोलीस कोठडी दरम्यान आरोपीतांकडे केलेल्या तपासादरम्यान त्यांचेकडून गुन्हयातील चोरी केलेले तोळे सोने व लेडीज पर्स असा एकूण १८३,५००/- किमतीचा ऐवज व आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली रु. ७०,०००/- किमतीची यामाहा एफझेड मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे. आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास करण्यात येत आहे. सदर दोन्ही अटक आरोपीत हे सराईत गुन्हेगार असून त्यांचेवर विविध पोलीस ठाण्यात खालील नमुद तक्त्याप्रमाणे गुन्हे नोंद आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आरोपी शेरा सुरेश चव्हाण यांचेविरुध्द मुरबाड पोलीस ठाणे ,

निगडी पोलीस ठाणे ,वर्सोवा पोलीस ठाणे ,कोपरखैरणे पोलीस ठाणे , खारघर पोलीस ठाणे ,नवघर पोलीस ठाणे ,सीबीडी बेलापुर पोलीस ठाणे ,पनवेल शहर पोलीस ठाणे, रबाळे पोलीस ठाणे , एनआरआय सागरी पोलीस ठाणे ,तळोजा पोलीस ठाणे ,खांदेश्वर पोलीस ठाणे ,नेरुळ पोलीस ठाणे ,मनोर (पालघर) पोलीस ठाणे , दादर (मुंबई) पोलीस ठाणे ,बोईसर (पालघर) पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत तर आरोपी विनोद उर्फ लंगडा अशोक पवार यांचेविरुध्द निगडी (पिंपरी चिंचवड) पोलीस, गावदेवी पोलीस ठाणे,मालवणी पोलीस ठाणे ,चारकोप पोलीस ठाणे ,बोरीवली पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत .

## कल्याण-मुरबाड महामार्गावर रायते नवीन पुलावर इको मिस्कर गाडीचा अपघात

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर (रशिद शेख)** : कल्याण मुरबाड महामार्गावर उल्हास नदीवरीव रायते नवीन पुलावर सकाळी झालेल्या इको प्रवाशी गाडी व सिमेंट मिक्सर गाडीमध्ये झालेल्या भीषण अपघातात इकोगाडीमधील ११जण जागीच ठार झाले, हा अपघात इतका भीषण होता की अनेक प्रवाशी गाडी मध्येच चिरडले होते, विशेष म्हणजे इको गाडिला ७प्रवाशी (लोकांची) परवानगी असताना तब्बल ४प्रवाशी ओहरशीट कसे भरले जातात? ट्राफिकवाले काय करतात? बळी गेलेल्या लोकांच्या मृत्यूस जबाबदार कोण? असे शेकडो प्रश्न या निमित्ताने विचारले जात आहेत, हा अपघात या वर्षातील सर्वात मोठा अपघात

माणला जात आहे, कल्याण हन इको गाडी नंबर एम एच ०५, जीडी०५२९ने तब्बल ११प्रवाशी मुरबाडकडे जात असताना रायते येथील नवीन पुलावर सिमेंट मिक्सर व इको

**अकराजण जागीच ठार, जबाबदार**



**कोण?**

गाडि मध्ये भीषण अपघात झाला , हा इतका भयानक होता की अनेक प्रवाशांचा गाडितच चेंदामेंदा झाला, गाडितील ११म्हणजे सर्व प्रवाशी जागीच ठार झाले, यामध्ये प्रशांत

चंदने (२१) देवगाव, मुरबाड, भूषण घोरपडे (४९) अंधेरी,लिपीक, मुरबाड, तहसील कार्यालय, जिजा केंबारी (५०) अनंता पवार (साखरे) दिपक गवळी, गणपत मधेअशा ६लोकांची ओळख पटली असून इतर५प्रवाशांची अद्याप ओळख पटलेली नाही,

विशेष म्हणजे दररोज कल्याण मुरबाड अशा शेकडो गाड्या प्रवाशांची ने आण करतात, इको गाड्यांना ड्रायव्हर प्लस ६प्रवाशी अशी ७लोकांची परवानगी असतानाया गाड्यांमध्ये कोंबड्या बक-या प्रमाणे माणसं कोंबली जातात. हे सर्व आरटीओ, वाहतूक पोलिस यांच्या 'आर्थिक, आशिर्वादाने चालते, इतकेच नव्हे तर काही गाड्यांची लायसन्स, परमिट संपलेले असताना ते रोडवर चालतात, अजून धक्कादायक म्हणजे काही गाड्या स्कार्फ केलेल्या असतानाही त्या कागदोपत्री स्कार्फ दाखवून आजही चोरुन चालविल्या जातात, हे सर्व कोणाच्या वरदहस्ताने ? अजून किती लोकांचा बळी जाण्याची वाट हे शासन पाहणार आहे? अर्धवट रस्ते, खड्डे, डिवायडर, स्पीड ब्रेकर, हे यमदूत म्हणून आहेत वेळ

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या ; स्नेहल कांबळे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी)** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या, असे आवाहन संविधान प्रचारक कार्यकर्त्या स्नेहल कांबळे यांनी केले. विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्नेहल कांबळे बोलत होत्या. मंडळाचे सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन सन्मानित ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास मंडळाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, माजी अध्यक्ष विनायक पेवेकर, सल्लागार



वासुदेव कदम, चित्रोळीकार मुकुंद कुलकर्णी, सी. के. सर्वगोड,बबन देशनेहरे आदि मान्यवर उपस्थित होते. स्नेहल कांबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. माता रमाई शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर अपूर्ण होते. स्वत:ची चार मुले दगावली असताना रमाईने डॉ. बाबासाहेब आंबेडकर परदेशात असताना स्वत: हाल अपेष्टा सहन करीत त्यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही, ते ज्ञानाचे महासागर, बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाजाला प्रवाहात आणले आहे. त्यांनी दिलेल्या समानतेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. डॉ. बाबासाहेबांकडे ११ भाषा व ३२ पदव्या होत्या. त्यांनी दिलेले संविधान जगात श्रेष्ठ आहे, असे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भिमजयंती २०० देशात साजरी होते असे स्नेहल कांबळे यांनी अधोरेखित केले. जगात महिलांना मतदानासाठी झगडावे लागले. परंतु आपल्या देशात डॉ. बाबासाहेबांनी महिलांना मतदानाचा अधिकार संविधानात दिला आहे, याकडे कांबळे यांनी लक्ष वेधले. पुणे स्टेशन जवळील साडे तीन एकरात माता रमाईचे स्मारक आहे. त्याठिकाणी आपण ज्येष्ठ नागरिकांनी भेट द्यावी, असे स्नेहल कांबळे विनम्र पणे म्हणाल्या. प्रारंभी प्रभात मित्र मंडळाच्या गायकांनी प्रभात समयी भिम गीते गाऊन वातावरण प्रफुल्लित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के, उपसचिव श्रध्दानंद निकम, भूमय्या सोमा, विलास देशनेहरे, हरिश्चंद्र गावकर, बबन माने, पोपट साठे आदिंनी परिश्रम घेतले.

## नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी: लखन वाल्हेकर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अनुवदन मोहन जाधव व सचिन मस्के व सुनिल काळे यांनी केले. यावेळी नेवासा पोलीस स्टेशनचे निरीक्षक पी.आय महेश पाटील, नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष शालिनीताई संजय सुखदान, माजीनगरसेवक सचिन नागपुरे, सलीम भाई अल्ताफ पठाण ,बापूसाहेब कापरे , तसेच व्यापारी वर्गातील रामभाऊ घोलप, प्रवीण शहाणे, एकनाथ वाघ, संतोष परबळकर, बाळासाहेब सोनवणे, सोमनाथ गायकवाड, संजय मिटकरे, बबन वाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच रिक्षा संघटनेचे अध्यक्ष भरत वालतुरे, सचिव योगेश काळे, उपाध्यक्ष गंगाराम नवसे यांच्यासह रिक्षाचालक सदस्य श्रीनिवास डहाळे आप्पासाहेब बंदिवान, किरण डाके, प्रमोद काळे, गंगाराम दगडे, संजय पोकळे, भाऊसाहेब डाके सचिन नागपुरे ,श्रीपतीराव दारुंटे, कैलास धारकर, रमेश गायकवाड आप्पासाहेब बंदीवान, अमन मंसूरी, आरिफ पठाण, योगेश दारुंटे, वैभव घोडके, मुन्ना पठाण, दिनेश लष्करे तसेच सामाजिक कार्यकर्ते, संजू भाऊ सुखदान ,दत्तू इरले, बाबासाहेब दगडे, अनिल वाडेकर, संकेत मिटकरे, व इतर नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## निफाडमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या नवीन मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा व कलश रोहन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानच्या वतीने निफाड येथील पुरातन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या नवीन मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन सोहळ्याचा भव्य धार्मिक उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. चार दिवस चाललेल्या या सोहळ्यात भाविकांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला.

गुरुवारी सकाळी मंदिरापासून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. सजवलेल्या रथामध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीची नवीन मूर्ती तर आकर्षक बैलगाडीत कलश ठेवण्यात आला होता. मिरवणुकीच्या अग्रभागी कलशधारी मुली, त्यानंतर वारकरी मंडळ सहभागी झाले होते. “श्री विठ्ठल” नामाचा जयघोष करत मिरवणूक उगाव रोड मार्गे मंदिरात पोहोचली. यामध्ये सजवलेले उंट, तसेच संगीताच्या तालावर नृत्य सादर करणारा अश्व हे विशेष आकर्षण ठरले. देवस्थानचे पदाधिकारी, नागरिक व भक्त मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गुरुवारी रात्री ह.भ.प. कविताताई पगार (लखमापूर) यांचे कीर्तन झाले. शुक्रवारी गणपती





पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, कर्ममंडप प्रवेश आदी विधी पार पडले. सायंकाळी ह.भ.प. अनिताताई जाधव यांचे कीर्तन झाले.

शनिवारी शांतीसूक्त, स्थापित देवतांचे पूजन, अभिषेक, प्रधान हवन तसेच भव्य दीपोत्सव व महाआरती संपन्न झाली. यावेळी प.पू. दादा गुरु महाराज उपस्थित होते. रात्री ह.भ.प. मिलिंद चवडंके यांनी वारकरी व नाथ संप्रदायावर प्रवचन दिले.

रविवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत शांतीसूक्त, अभिषेक, मंडल देवता पूजन, उत्तरांग हवन यांसह श्रीमूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशरोहन व ध्वजस्थापना विधी पार पडले. संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प. गुरु योगीराज महाराज पैठणकर यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, तर प.पू. गणेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते कलशरोहन करण्यात आले.

यानंतर ह.भ.प. योगेश महाराज जाधव यांचे काल्याचे कीर्तन झाले आणि दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या चार दिवसीय सोहळ्याचे पौरोहित्य आचार्य राहुल कुलकर्णी, आचार्य दिलीप कुलकर्णी, आचार्य सारंग भार्गवे, आचार्य स्वप्निल जोशी, दर्शन जोशी, रोहन कुलकर्णी व सहकारी ब्रह्मवृंद यांनी केले. हा धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान, निफाडकर नागरिक व भक्त मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वार्षिक निकाल व गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी :रामपुरी** -शांताई इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, रामपुरी येथे शैक्षणिक वर्ष 2025–26 चा वार्षिक निकाल जाहीर करण्यात आला तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अमोल मस्के व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रास्ताविकात शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रमांचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. त्यानंतर वार्षिक निकाल जाहीर करून प्रत्येक वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात अमोल मस्के यांनी विद्यार्थ्यांना सातत्य, परिश्रम आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला महिला पालकांसह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल** : जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण आणि एससी, एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती महोत्सवाचे आयोजन 14 एप्रिल रोजी करण्यात आले होते. यावेळी एडवोकेट, प्रोफेसर प्रियांका डोके-मंडलिक (एचओडी ऑफ डॉ. डी वाय पाटील कॉलेज ऑफ लॉ नेरूळ) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, जर बाबासाहेब आज जिवंत असते तर त्यांनी सर्वप्रथम समाजातील वाढती असमानता, जातीय भेदभाव आणि



सामाजिक अन्याय याविरुद्ध कडक आवाज उठवला असता आणि आपल्याला त्यांनी आठवण करून दिली असती की संविधान फक्त पुस्तकात नाही तर ते आपल्या वागण्यात आणि विचारात दिसले पाहिजे. शिक्षणाच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष त्यांनी दिले असते आणि शिक्षण फक्त पदवी मिळवण्यासाठी पुरेसे नाही तर शिक्षणाने माणूस विचारशील, स्वाभिमानी आणि जबाबदार बनला पाहिजे तसेच चुकीच्या माहितीविरुद्ध त्यांनी जनजागृती केली असती असे सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्व नसून एक विचारधारा आहे. बाबासाहेबांच्या विचारांचे पालन करूनच आपण खऱ्या अर्थाने समाज आणि न्याय समाज निर्माण करू शकतो असे प्रियंका डोके-मंडलिक यांनी सांगितले.

# जेएनपीए येथे 'विवेकी विचारांचा जागर'आणि 'भीम स्वरांचा जयघोष

## 'एससी- एसटी एम्प्लॉईज असोसिएशन तर्फे महामानवास अभिवादन!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण आणि एससी-एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रनिर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जेएनपीए टाऊनशिपमधील बहुउद्देशीय सभागृहात हा सोहळा संपन्न झाला.सकाळी पाहुण्यांच्या आगमनानंतर सामूहिक 'बुद्ध वंदने'ने कार्यक्रमाची मंगलमय



सुरुवात झाली. याप्रसंगी प्रबोधन कला मंचाच्या शितल भंडारे यांनी सादर केलेल्या 'विवेकी विचारांचा जागर' या शाहिरी जलशाने उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला न्हावा शेवा पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे आणि त्यांच्या पोलीस सहकारी टीमने विशेष उपस्थिती लावून अभिवादन केले. तसेच जेएनपीएचे प्रमुख कामगार विश्वस्त दिनेश पाटील, रवींद्र पाटील, माजी कामगार विश्वस्त भूषण पाटील, सुरेश पाटील, प्रमुख मान्यवरांमध्ये व्याख्याते डी. के. सोनवणे साहेब , विधि तज्ञ, रिटायर्ड जज्ज ॲड जयप्रकाश सावंत आणि ॲड डॉ. प्रियांका लोके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये (अध्यक्ष) देवानंद पवार, (सचिव) संदीप कांबळे, (खजिनदार) राजेश सोनकुसरे, (उपाध्यक्ष) सदानंद कोळी, (सहसचिव) विनय पवार, (सहखजिनदार) धनंजय धकीते , (समिती सदस्य) शिशिर बनसोडे, जयश्री पाठारे ,माधुरी मोहकर, प्रमोद पवार ,सुभाष ठाकूर, निवास कांबळे ,अरुण बोकडे ,सुनील जाधव, पंडित चव्हाण ,प्रकाश कांबळे ,अतुल नामे व असोसिएशनचे सर्व सभासद आणि कार्यकर्ते यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले. या सोहळ्यासाठी एससी एसटी एम्प्लॉय असोसिएशनचे सदस्य त्यांचे कुटुंबीय जेएनपीए कर्मचारी आणि न्हावाशेवा पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली

# भीमरायाचा जयघोष! चिखलवर्ध्यामध्ये महामानवाची १३५ वी जयंती विचारांच्या जागरणाने साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : निळया नभाच्या छायेत आणि महामानवाच्या विचारांच्या प्रकाशात, घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या दिमाखात साजरी झाली. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही भपका न ठेवता अत्यंत साध्या आणि संस्कारमय पद्धतीने चिखलवर्धावासीयांनी हा उत्सव साजरा केला. गावचे सरपंच श्री. जैतू मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख वक्ते श्री. शंकर केमेकार सर यांनी बाबासाहेबांच्या जीवनसंघर्षाचा पट उपस्थितांसमोर मांडला.





याप्रसंगी व्यासपीठावर आकाशभाऊ आत्राम, पी.एस. आय. राठोड सर, पोलीस पाटील गणेश कुमरे, प्रेमभाऊ वेट्टी, ताडसावळीचे पोलीस पाटील आनंदरावजी कानिदे, उपसरपंच आकाश नडपेलवार आणि दिनकर तुमरे या मान्यवरांची उपस्थिती होती.

या उत्सवाचे खास रूप तेव्हा पाहायला मिळाले जेव्हा ताडसावडी, गोविंदपूर, गवरतड आणि कुर्ली या शेजारच्या गावांमधील अबालवृद्ध, पुरुष आणि महिलांनी मोठ्या संख्येने चिखलवर्ध्यात हजेरी लावली. जनसागराच्या या उपस्थितीने परिसराला जणू भीममय करून टाकले होते. साध्या पण प्रभावी अशा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कनाके यांनी आपल्या शैलीत केले, तर आलेल्या सर्व पाहुण्यांचे आणि भीम अनुयायांचे आभार दिनेश नडपेलवार यांनी मानले. चिखलवर्ध्यातील या वैचारिक सोहळ्याची चर्चा आता संपूर्ण तालुक्यात होत आहे.

# मुदगल येथे चक्क सिंगल डि पी वर कृषीपंप ; ग्रामस्थ अंधारात

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** :पाथरी तालुक्यातील वाघाळा ३३ कें व्हि अंतर्गत असलेल्या मुदगल येथे तीन ते चार सिंगल डि पी बसविण्यात येवून बरंच दिवसांचा कालावधी झाला असून अद्याप ही मुदगल बस स्टॅण्ड व मुदगलेश्वर मंदिर परिसरात सिंगल विद्युत पुरवठा चालू नसून येथे सतत विजपुरवठा खंडित असतो. मुदगलेश्वर मंदिरमध्ये सतत धार्मिक विधी करण्यासाठी राज्य सह परराज्यातील भाविक येतात परंतु या भाविकांना अंधाराचा सामना करावा लागतो तसेच बस स्टॅण्ड परिसरातील नागरिकांना शुद्ध आठ आठ दिवस विजपुरवठा खंडित होतो तर एकीकडे मुदगल गावात चक्क रात्रीनदिवश या सिंगल डि पी वर कृषीपंप काही शेतकरी चालवितात ही आश्चर्याची बाब आहे महावितरण कंपनीने मुदगल येथील या सिंगल डि पीला मिटर बसविले आहेत एका सिंगल डि पी वरुन किती युनिट वीज वितरण होते हे पाहण्यासाठी बसविण्यात पण याच महावितरण कंपनीने. मुदगल येथील एका सिंगल डि पीचे मिटर चक्क.बंद पडलेल्या थ्री फेस डि पी वरच हे मिटर बसविले आहे तर आता तो बंद पडलेला डि पी दोन



दिवसांपूर्वी चालू केले आणि ते मिटर बंद केले हे सर्व प्रकार नेमका काय आहे हेच बस स्टॅण्ड परिसरातील नागरिकांना व मंदिर परिसरातील नागरिकांना समजण्यास येत नाही तर या परिसरातील नागरिकांनी सिंगल डि पी वरुन विजपुरवठा द्यावे असे सतत महावितरण कंपनी कडे मागणी केली लोकप्रतिनिधीकडे मागणी केली परंतु याकडे सर्वांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे तर आता तरी महावितरण कंपनीने मुदगल येथील या परिसरातील नागरिकांना सिंगल डि पी वरुन द्यावे असे मागणी या परिसरातील नागरिकांतून होत आहे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बोपेगाव शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत सूर्यनमस्कार व योगासने उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : निफाड (जि. नाशिक) भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून आणि 'क्रीडा सह्याद्री फाउंडेशन'च्या वतीने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा बोपेगाव येथे सामूहिक सूर्यनमस्कार व योगासने उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या आरोग्यदायी उपक्रमात शाळेतील तब्बल 95 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत शिस्तबद्ध सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे समन्वयक आणि क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांकडून ११ सामूहिक



सूर्यनमस्कार करून घेतले. तसेच योगासनांमध्ये वृक्षासन, गरुडआसन,

यांसारख्या महत्त्वाच्या आसनाचे प्रात्यक्षिक करून घेत त्याचे फायदे समजावून सांगितले. विद्यार्थ्यांमधील एकाग्रता आणि शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी योगासने कशी उपयुक्त ठरतात, याचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. आरोग्यविषयक प्रबोधन शाळेचे अधीक्षक विजेंद्र पाटील यांनी त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माहिती व यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दैनंदिन जीवनात सूर्यनमस्कार आणि योगाभ्यासाचा समावेश केल्यास शरीर निरोगी आणि मन प्रसन्न राहते. शालेय जीवनापासूनच ही शिस्त लावणे आवश्यक आहे." या उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक जगन्नाथ रंधवे ,महेंद्र कोतकर,उपशिक्षक गोरखनाथ देशमुख, विजेंद्र पाटील, सुनील भागवत,उपशिक्षिका सुलभा अहिरे, प्रतीक्षा पवार, जयमाला भामरे ,अशा डोखे,सीताबाई हडस यानी उपक्रमासाठी व शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभा अहिरे यांनी केले. क्रीडा शिक्षक विलास गायकवाड च्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मोहदरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती थाटात साजरी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजू गायकवाड(मोहदरी)** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त उमरखेड तालुक्यातील मोहदरी येथे विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरी करण्यात आली. या निमित्ताने संपूर्ण गाव निळ्या रंगात न्हाऊन निघाले होते.

सकाळी गावातील विहाराजवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला



होता. गावातील युवा तरुण मंडळी आणि जेष्ठ नागरिकांनी या उत्सवाच्या नियोजनात मोलाची भूमिका बजावली. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत भीमगीतांच्या तालावर अबालवृद्धांनी उत्साहात सहभाग नोंदवला.

केवळ मिरवणूकच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत प्रल्हाद तुकाराम श्रावणे यांनी मिरवणुकीत सामील झालेल्या नागरिकांना अल्पाहाराची व्यवस्था केली होती.या कार्यक्रमासाठी मोहदरी येथील ग्रामस्थ, महिला मंडळ आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# सिद्धार्थ विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले**
**लाखनी भंडारा** : सावरी / मुरमाडी येथील सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या कु. स्वाती वासनिक मॅडम होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कु. मनिषा सुखदेवे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्या वासनिक



मॅडम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा अमूल्य संदेश दिला. "ध्येय पूर्ण होईपर्यंत थांबू नका," असा प्रेरणादायी मूलमंत्र देत त्यांनी विद्यार्थ्यांना जिद्दीने पुढे जाण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुण्या कु. मनिषा सुखदेवे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले व सामाजिक जाणीवा वाढवण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाला विद्यालयातील सौ. वंदना आगाशे, स्वाती खोटेले, सुरेखा गभणे, स्मिता आगाशे, कविता साठवणे, विकास काशिवार, भरत राऊत, आशिष सिंगनजुडे, सुभाष ठाकरे, शिरीष लोगडे, विजय रिनाईत तसेच इतर शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कु. प्रतिभा अगळे यांनी केले. शेवटी "वंदे मातरम्" गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# वांगण सुळे येथे भीमजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** वांगण सुळे येथिल बिरसा मुंडा चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जय भिम , शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा अशा अनेक जयघोषात साजरी करण्यात आली.शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून जय भिम अशा घोषणा देत कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त दिले.डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला गावचे पो.पाटील श्री. परशराम चौधरी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सर्व विद्यार्थी, ग्रामस्थ व महिला भगिनी यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. आनंदा टोपले यांनी मार्गदर्शन करताना



सांगितले की, जगातील सर्वात मोठी लोकशाही ज्यांनी लिहिली ते महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय आणि विषमता याविरुद्ध लढणारे समाजसुधारक, विचारवंत आणि राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर आहेत. त्यांचे सामाजिक विचार आपल्या भारतीय समाजाच्या परिवर्तनासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरले आहेत. त्यांनी न्याय व हक्क मिळवण्याचा मार्ग दाखवला.त्याचबरोबर श्री. दिपक भोये यांनीही उपस्थित ग्रामस्थांना अनमोल असे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांसमवेत भारतीय संविधान जपण्याची व त्यातील मुलांचे पालन करण्याची शपथ घेतली. सर्वसामान्य जनतेला आपले संवैधानिक हक्क व अधिकार यांची ओळख व्हावी म्हणून बिरसा मुंडा चौकात संविधानातील उद्देशिका यांचे बॅनर ही लावण्यात आले होते.कार्यक्रमाला सर्व शिक्षक , पो.पाटील श्री. परशराम चौधरी, जनार्दन कामडी, बळवंत जाधव, कांतीलाल भुसारे, शिवराम टोपले, राजाराम टोपले, गुलाब म्हसे, मधुकर म्हसे, केशव टोपले, व ग्रामस्थ, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सला प्रगत स्ट्रोक केअर सेवांसाठी QAI कडून मिळाली मान्यता

## नवी मुंबईतील पहिले 'ॲडव्हान्स्ड स्ट्रोक सेंटर' : उच्च दर्जाच्या स्ट्रोक उपचार सेवांसाठी हॉस्पिटलने गाठला महत्त्वपूर्ण टप्पा

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर** : खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सला त्यांच्या ॲडव्हान्स्ड स्ट्रोक सेंटरसाठी क्वालिटी अँड ॲक्रेडिटेशन इन्स्टिट्यूट (QAI) कडून मान्यता प्राप्त झाली असून हे नवी मुंबईतील पहिले 'ॲडव्हान्स्ड स्ट्रोक सेंटर' ठरले आहे. ही मान्यता मिळाल्याने उच्च दर्जाच्या स्ट्रोक उपचार सेवांसाठी हॉस्पिटलने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय निकषांनुसार प्रगत स्ट्रोक केअर सेवा पुरविली जाते. वेळीच निदान, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान, उत्तम स्ट्रोक युनिट आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयातून काम करणारी मल्टिडिसिप्लिनरी टीमचा समावेश असलेली मजबूत यंत्रणा या हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. यामुळे हॉस्पिटल अत्यंत गुंतागुंतीच्या स्ट्रोक प्रकरणांनाही आपल्या कार्यक्षमतेने यशस्वीपणे हाताळू शकते, ज्यामुळे जलद निर्णयप्रक्रिया, उपचार आणि सुधारित परिणाम साध्य होतात.

डॉ. पवन ओझा( संचालक - न्यूरोसायन्स) म्हणाले,* स्ट्रोक हा मेंदूमध्ये ब्लॉकेजेस किंवा रक्तस्रावामुळे उद्भवतो. यामध्ये अचानक अशक्तपणा, बोलण्यात अडचणी जसे की अचानक बोलणं थांबणं आणि काही काळ बोलता न येणं किंवा चेहरा वाकडा होणे अशी लक्षणे दिसतात. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास यामुळे आयुष्यभरासाठी अपंगत्व, पक्षाघात, बोलताना अडचणी येणे, स्मरणशक्ती किंवा आकलनविषयक समस्या



निर्माण होऊ शकतात. स्ट्रोक व्यवस्थापनासाठी अत्यंत समन्वयित पद्धत आवश्यक असते आणि वेळ हा यामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक असतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आम्ही एक सर्वसमावेशक ॲक्युट स्ट्रोक केअर पाथवे तयार केला आहे, ज्यामुळे रुग्ण हॉस्पिटलमध्ये आल्याक्षणीच त्यांना तत्काळ उपचार मिळतात. प्रगत इमेजिंगद्वारे जलद निदानापासून ते वेळेवर औषधोपचार आणि न्यूरो-इंटरव्हेन्शनल उपचारांपर्यंत प्रत्येक टप्पा मेंदूचे नुकसान कमी करण्यासाठी आणि रुग्णाच्या पुनर्प्राप्तीला गती देण्यासाठी आखण्यात आला आहे. क्वालिटी अँड ॲक्रेडिटेशन इन्स्टिट्यूट (QAI) ही आरोग्यसेवा संस्थांना उच्च दर्जाचे निकष पूर्ण केल्याबद्दल प्रमाणित करणारी सर्वोच्च संस्था आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या स्ट्रोक केअर सेवांना मिळालेली ही मान्यता त्यांच्या उत्तम, कार्यक्षम आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रणालीचे प्रतीक आहे. यामुळे हॉस्पिटलची उच्च दर्जाची स्ट्रोक सेवा पुरविण्याची क्षमता अधोरेखित होते, तसेच अत्यंत गुंतागुंतीच्या प्रकरणांनाही वेगाने आणि अचूकतेने हाताळण्याची ताकद स्पष्ट होते.

डॉ ओझा पुढे सांगतात की; स्ट्रोक केअर केवळ आपत्कालीन उपचारांपुरती मर्यादित नसून ती पोस्ट-स्ट्रोक रिहॅबिलिटेशनपर्यंत विस्तारलेले आहे, ज्याचा उद्देश दीर्घकालीन पुनर्प्राप्ती साध्य करणे हा असतो. आम्ही वेळीच उपचार, रुग्णांमध्ये जनजागृती, सक्षमीकरण आणि न्यूरो-रिहॅबिलिटेशन सपोर्ट यावर भर देतो, जेणेकरून स्ट्रोकग्रस्त रुग्णांना पुन्हा स्वावलंबी होता येईल आणि त्यांचे जीवनमान सुधारता येईल. क्युएआय मान्यतेमुळे आमच्या सेवांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी आम्हाला प्रेरणा मिळली आहे.

डॉ. हरीश नाईक(न्यूरोसर्जन, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई ) म्हणाले,* स्ट्रोक ही एक वैद्यकीय आणीबाणी आहे, ज्यामध्ये प्रत्येक सेकंद महत्त्वाचा ठरतो. योग्य वेळी उपचार मिळाल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो, अन्यथा आयुष्यभरासाठी अपंगत्व येऊ शकते. आम्ही वेळीच आणि योग्य सेवा रुग्णांपर्यत पोहोचविण्यासाठी सदैव तत्पर आहोत.

संदीप जोशी (केंद्र प्रमुख - मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) म्हणाले,* या मान्यतेमुळे हॉस्पिटलने नवी मुंबई आणि आसपासच्या भागात प्रगत स्ट्रोक केअर सेवांसाठी विश्वासार्ह केंद्र म्हणून आपले स्थान आणखी बळकट केले आहे. यामुळे रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार पुरविले जातात.

नीरज लाल, (रिजनल डायरेक्टर -महाराष्ट्र आणि कर्नाटक विभाग, मेडिकव्हर हॉस्पिटल्स) सांगतात की,* क्युएआयकडून मिळालेली ही मान्यता आमच्या टीमसाठी अभिमानाचा क्षण आहे. स्ट्रोक सारख्या गंभीर प्रसंगी रुग्णांना विश्वासार्ह आणि प्रगत उपचार पुरविणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.



**भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. भाजपचे राज्य परिषद सदस्य व ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेवक अजय बहिरा, रुपेश नागवेकर, हेमंत माने, सचिन दिसले, अशोक आंबेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व घटनात्मक योगदानाची आठवण करून दिली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजातील सर्व घटकांच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच त्यांच्या समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी बाबासाहेबांचा जयजयकार जयघोष करण्यात आला.** **( दैनिक युवक आधार )**

# शिरपूर ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी ; शिवसेनेच्या वतीने आयोजन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : ग्रामपंचायत शिरपूर कार्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शिवसेनेच्या वतीने अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी परिसरात सामाजिक एकात्मता, समता आणि बंधुत्वाचा संदेश देत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी



बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. "शिक्षण, संघटन आणि संघर्ष" या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाज उभारणीचा संदेश बाबासाहेबांनी दिला असून तो प्रत्येकाने आचरणात आणावा, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाला सरपंच विलास कांबळे, उपसरपंच असलम भाई परसु वाले, माजी सरपंच संतोष आढागळे, पंचायत समिती सदस्य गजानन इरतकर, दस्तगीर पैलवान, गणेश सिंग ठाकूर, संतोष शेंडे, रफिक भाई, शिवसेना शहर प्रमुख कैलास राऊत तसेच ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून बाबासाहेबांच्या कार्याचा आणि त्यांच्या संघर्षमय जीवनाचा उल्लेख करत समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या योगदानाची आठवण करून दिली.

आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजप्रबोधनाचे कार्य पुढे नेले पाहिजे, असे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान वातावरणात घोषणांनी उत्साह संचारला होता. "जय भीम", "संविधानाचा जयघोष" अशा घोषणा देत उपस्थितांनी बाबासाहेबांना अभिवादन केले.

एकंदरीत, शिरपूर येथे आयोजित हा कार्यक्रम सामाजिक ऐक्य, प्रेरणा आणि जागृतीचा संदेश देणारा ठरला असून, बाबासाहेबांच्या विचारांची ज्योत अधिक प्रखर करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# सिल्लोड तालुक्यात महामानवाचा जयघोष

## ( राजकीय पक्ष व विविध संस्थांतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन )

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** :भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मंगळवारी (दि. १४) सिल्लोड तालुक्यात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात व गौरवपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. विविध सामाजिक व शैक्षणिक संस्था, राजकीय पक्ष आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

सिल्लोड: भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहर कार्यालय, स्मारक आणि पंचायत समिती येथे सोहळा पार पडला. यावेळी विधानसभा नेते सुरेश बनकर यांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या




संदेशाचा पुनरुच्चार केला. यावेळी 'सिद्धेश्वर'चे चेअरमन ज्ञानेश्वर मोठे, सभापती अनिता बनकर, उपसभापती भगवान आहेर, शहराध्यक्ष मनोज मोरेल्लू, एकनाथ हिवाळे, अनिल खरात, नेहा खरात, विष्णू काटकर, किशोर जगताप, गजानन जाधव, गणेश भूमकर, स्वप्नील शिनगारे, सुनील बोराडे, दादाराव गोरे, अतुल साळवे, निखिल गवळी, ईश्वर कुंटे, अनिल डिडोरे, दिनेश हाडोळे उपस्थित होते.

लिहाखेडी: येथील 'कै. कडुबा पाटील साखळे स्मृती ग्रंथालय' येथे संस्थापक अध्यक्ष प्रा. शिवराम साखळे व सचिव अशोक साखळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिमा पूजन झाले. कार्यक्रमास दिलीप साखळे, नामदेव साखळे, ग्रामसेवक राठोड, डी. टी. गव्हाणे, बाळा बावस्कर, गजानन बावस्कर, हरिदास साखळे, विनोद चव्हाण, अतुल थोरात, राजू साखळे, सिताराम साखळे, सयाजी गोरे, बाळा फरकाडे, संजय बावस्कर, पप्पू साखळे, फौजी जेठे, सपकाळ, गणेश काळे, कैलास आरक, विशाल फरकाडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

पालोद: येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात प्राचार्य प्रदीप कानडजे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी दिलीप जाधव, राजेश ठोंबरे, प्रफुल कळम, कृष्णा पाटील, योगेश निंभोरे, भास्कर केरले, सुनील सागरे, गजानन सपकाळ, डॉ. रमेश काळे, संजय जाधव, संतुराव मोरे, अक्षय निकम उपस्थित होते. पालोद ग्रामपंचायत कार्यालयातही प्रशासकीय अधिकारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत जयंती साजरी झाली.

# सिल्लोडच्या मुख्य चौकात 'छत्रपती संभाजी महाराज प्रवेश द्वार' उभारा

## अमोल ढाकरे यांचे प्रशासनाला निवेदन ; पुतळा उभारणीसह निधीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पाटील/सिल्लोड: :** सिल्लोड-छत्रपती संभाजीनगर या मुख्य महामार्गावरील 'छत्रपती संभाजी महाराज चौक' येथे भव्य 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रवेश द्वार' आणि महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात श्री. अमोल अशोकराव ढाकरे यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि नगर परिषद मुख्याधिकारी यांना दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सविस्तर कायदेशीर निवेदन सादर केले.

सिल्लोड शहर हे जागतिक कीर्तीच्या अजिंठा लेण्यांकडे जाणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांच्या मार्गावरील प्रमुख केंद्र आहे. या मार्गावरील छत्रपती संभाजी महाराज चौक हा वाहतुकीचा आणि दळणवळणाचा मुख्य केंद्रबिंदू असून, येथे दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे पराक्रमी आणि



धर्मरक्षक राजा म्हणून संपूर्ण विश्वात वंदनीय आहेत. त्यांच्या शौर्याची आणि त्यागाची ओळख जागतिक स्तरावर पोहोचण्यासाठी तसेच शहराची ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळख अधिक ठळक करण्यासाठी या ठिकाणी भव्य प्रवेशद्वार व पुतळा उभारणे अत्यंत न्याय्य आणि आवश्यक असल्याचे श्री. ढाकरे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

नगर परिषद प्रशासनामार्फत शहरात विविध ११ ठिकाणी स्वागत कमानी व प्रवेशद्वारे उभारण्याचे काम नियोजित आहे. याच प्रकल्पांतर्गत, ज्या थोर राजाच्या नावाने हा प्रमुख चौक ओळखला जातो, तिथेच भव्य स्मारक उभारणीला प्राधान्य द्यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. प्रस्तावित ठिकाणी भव्य प्रवेशद्वार उभारल्यास स्थानिक नागरिकांमध्ये इतिहासाप्रती अस्मिता निर्माण होईल. तसेच अजिंठा लेण्यांकडे जाणाऱ्या पर्यटकांसमोर महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची प्रभावी छाप निर्माण होईल व शहराच्या सौंदर्यीकरणात मोठी भर पडेल, असा विश्वास श्री. अमोल अशोकराव ढाकरे यांनी व्यक्त केला आहे.

प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने स्थळ पाहणी करावी, तसेच आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# भीमजयंतीला महावितरणचे सुरक्षा 'कवच'

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 14 एप्रिल रोजी नागपूर शहरात निघणाऱ्या भव्य मिरवणुका आणि विविध कार्यक्रमांसाठी महावितरणने कंबर कसली आहे. दीक्षाभूमी, संविधान चौक, डॉ. आंबेडकर चौक, इंदोरा, रामेश्वरी, मेडीकल चौक, भगवान नगर आणि जयभीमनगर यांसारख्या प्रमुख केंद्रांवर अनुयायांची होणारी अलोट गर्दी लक्षात घेता, अखंडित वीजपुरवठा आणि सार्वजनिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने विशेष कृती आराखडा तयार केला आहे. या भागातील देखभाल-दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असून, संपूर्ण उत्सव काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी मिरवणूक मार्गांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अडथळे दूर केले आहेत. विशेषतः उंच चित्ररथांना अडथळा ठरू शकणाऱ्या लोंबकळणाऱ्या वीज तारा आणि सर्व्हिस वायर्सची उंची सुरक्षित स्तरावर वाढवण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून अनेक ठिकाणी उघड्या तारा बदलून त्या जागी अत्याधुनिक इन्सुलेटेड केबल्स टाकण्यात आल्या आहेत. उत्सवाच्या काळात कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवू नये, यासाठी मुख्य ठिकाणांवर कर्मचाऱ्यांची विशेष पथके तैनात राहतील, असे आदेश प्रशासनातर्फे देण्यात आले आहेत.

सुरक्षिततेचे भान, हेच खरे अभिवादन: तांत्रिक सज्जतेसोबतच महावितरणने सामाजिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. मिरवणूक, डीजे आणि ढोल-ताशांच्या गजरात कोणताही अपघात घडू नये, यासाठी आयोजकांना काही महत्त्वाचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वागत कक्ष किंवा रोषणाईसाठी वीज खांबावरून अनधिकृतपणे वीज घेणे टाळावे, तसेच पिण्याच्या पाण्याचे स्टॉल्स विद्युत डीपी किंवा खांबांपासून सुरक्षित अंतरावर ठेवावेत. चित्ररथांवरील ध्वज किंवा सजावट करताना वरून जाणाऱ्या उच्च दाबाच्या तारांचा अंदाज घेऊनच हालचाली कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मिरवणुकीसाठी खास मार्गदर्शक तत्त्वे: मिरवणूक सुरू करण्यापूर्वी आयोजकांनी ठरवलेल्या मार्गातील विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर आणि ओपन जंक्शन बॉक्सची माहिती आधीच घ्यावी. शक्य असल्यास कमी उंचीच्या वाहनांचा वापर करावा आणि जनरेटर ट्रॉली सुरक्षित अंतरावर ठेवावी. मिरवणुकीच्या पुढे जाणारे स्वयंसेवक नेमून त्यांना धोक्याची सूचना देणारी साधने द्यावीत. कुठेही तुटलेल्या वायर्स किंवा विजेची ठिणगी दिसल्यास तात्काळ प्रशासनाला कळवून नागरिकांनी त्या जागेपासून सुरक्षित अंतर ठेवावे.

आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरित मदतीसाठी महावितरणने उपलब्ध करुन दिलेल्या 1912, 1800-233-3435, 1800-212-3435 किंवा 022-50897100 या क्रमांकावर संपर्क साधावा. उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक अभियंता आणि 'जनमित्रांचे' मोबाईल क्रमांक आपल्याकडे ठेवावेत, जेणेकरून वेळेवर समन्वय साधणे सोपे होईल. "उत्सवाचा आनंद सुरक्षिततेचे भान राखून साजरा करणे हीच महामानवाला खरे अभिवादन ठरेल," असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे.

# वाशिममध्ये गोपाळ समाजाचा ऐतिहासिक महा मेळावा यशस्वी; युवकांच्या एकजुटीने निर्माण केला नवा इतिहास!

## जिल्हाभरातून उसळला समाजबांधवांचा जनसागर; युवक जोडो अभियानाच्या कार्याचा प्रभावी आविष्कार

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम "एकजूट हीच आपली खरी ताकद, आणि संघर्ष हाच आपल्या प्रगतीचा मार्ग!" या जाज्वल्य विचारांनी प्रेरित होऊन ११ एप्रिल २०२६ रोजी वाशिम येथे आयोजित करण्यात आलेला गोपाळ समाजाचा जिल्हास्तरीय भव्य महा मेळावा अभूतपूर्व उत्साहात आणि उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. या ऐतिहासिक मेळाव्याने समाजातील एकजुटीची ताकद दाखवून देत नव्या परिवर्तनाची नांदी ठरवली.

गोपाळ समाज युवक जोडो अभियान वाशिम जिल्ह्याच्या वतीने आयोजित या मेळाव्याला जिल्हाभरातून युवक, माता-भगिनी आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संपूर्ण परिसर घोषणांनी, उत्साहाने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेने भारावून गेला होता.

या मेळाव्याचे नेतृत्व युवा नेते मच्छिंद्र गव्हाणे यांनी केले. मेजर प्रदीप हाबंरे, मेजर कैलास कालापाड, अमोल यशवंत, रोशन कालापाड, विठ्ठल मोरे, युवा नेते दत्ताभाऊ लोणारे, प्रदीप सांबरे तसेच इतर सहकाऱ्यांनी अल्पावधीत गावोगावी जाऊन जनजागृती करत अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावी नियोजन केले. त्यामुळे हा मेळावा भव्य यशस्वी ठरला.




कार्यक्रमादरम्यान समाजावर होणारे अन्याय, अत्याचार आणि उपेक्षा याविरोधात ठोस भूमिका घेण्यात आली. युवकांना रोजगार, विद्यार्थ्यांना न्याय आणि गरजू कुटुंबांना मदत या महत्त्वाच्या मुद्द्यांवर एकमताने ठराव मंजूर करण्यात आले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना मच्छिंद्र गव्हाणे यांनी "युवक जोडो अभियान" हे महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून, कोणतेही पद नसलेले हे एकमेव सामाजिक अभियान असल्याचे सांगितले. "माझ्या उत्पन्नातील मोठा हिस्सा मी समाजकार्यासाठी खर्च करतो. ज्या ठिकाणी अन्याय होतो, त्या ठिकाणी आमची टीम तत्काळ पोहोचते," असे त्यांनी ठामपणे नमूद केले. पदलालसेवर टीका करत त्यांनी "ज्याला पदाची भूक आहे, तो समाजासाठी काम करू शकत नाही," असे स्पष्ट मत मांडले.गव्हाणे यांनी आपल्या भाषणात अनेक जिवंत उदाहरणांद्वारे समाजकार्य मांडले. पांगरी नवघरे येथील मदतकार्य, गरीब कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी सहाय्य, वीजजोडणी मिळवून देणे, पुसद येथील नवजात बाळाचे प्राण वाचवण्यासाठी केलेली मदत तसेच ग्रामीण भागातील प्रसूतीसाठी वाहन व्यवस्था अशा विविध उपक्रमांचा त्यांनी उल्लेख केला. "समाजासाठी काहीतरी देणे ही आपली जबाबदारी आहे," असेही त्यांनी सांगितले.

संघटन उभारण्याच्या प्रयत्नात आलेल्या अडचणींचाही त्यांनी उल्लेख करत, "गैरसमज आणि आरोपांना सामोरे जावे लागले, तरीही मी समाजासाठी लढत आहे," असे सांगितले. तरीदेखील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला लढा सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या मेळाव्यात गोपाळ समाजाचे युवा नेते दत्ताभाऊ लोणारे आणि मेजर प्रताप हांबरे यांनी समाजबांधवांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करत एकजूट, शिक्षण आणि संघटनशक्तीचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.यावेळी उपस्थित मान्यवर डॉ. रामकृष्ण कालापाड यांनी शिक्षण,एकजूट आणि सामाजिक प्रगतीचा संदेश देत समाजाला प्रेरित केले. इतर मान्यवरांनीही समाजाच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.

या मेळाव्यासाठी अर्जुन भाऊ गिऱ्हे,राजु भाऊ वंजारे, राम भाऊ माळी,विजय भाऊ महाजन यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.हा मेळावा केवळ एक कार्यक्रम न ठरता, समाजाच्या स्वाभिमानाची जागृती करणारा आणि भविष्यासाठी नवी दिशा देणारा ठरला. युवकांच्या प्रचंड सहभागामुळे पुन्हा एकदा "जिथे युवक जागा होतो, तिथे इतिहास घडतो" हे सिद्ध झाले असून, वाशिममधील हा महा मेळावा गोपाळ समाजाच्या संघटनशक्तीचा भव्य आविष्कार ठरला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नागपुरात दारूबंदीचा आदेश

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 14 एप्रिल 2026 रोजी नागपूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दारूबंदीचा आदेश जारी करण्यात आला आहे.

श्री कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिलेल्या आदेशानुसार, 14 एप्रिल रोजी सकाळी 6.00 ते रात्री 6.00 वाजेपर्यंत संपूर्ण नागपूर शहरातील सर्व मद्यविक्री दुकाने, बार, परमिट रूम, तसेच इतर अनुज्ञप्तीधारक आस्थापनं पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत.

हा आदेश मुंबई दारूबंदी अधिनियम 1949 च्या कलम 142(1) अंतर्गत लागू करण्यात आला आहे. या कालावधीत कोणत्याही प्रकारची मद्यविक्री, साठा किंवा वितरण करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

प्रशासनाच्या सूचनेनुसार, डॉ. आंबेडकर जयंती निमित्त शहरात मोठ्या प्रमाणावर मिरवणुका, कार्यक्रम आणि नागरिकांची गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

## शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर येथील मराठी विभागाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर (प्रतिनिधी )/अरविंद पांचाळ दाभडकर** : अर्धापूर येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित शंकरराव चव्हाण महाविद्यालय , अर्धापूरातील मराठी विभागाच्यावतीने महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त तसेच कै. डॉ. शंकररावजी चव्हाण साहेब व कै. कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजय टेंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागप्रमुख डॉ. ल.ना.वाघमारे विभागातील डॉ.संगीता घुगे व डॉ . रंगनाथ नवघरे यांनी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धेचे आयोजन विभागाच्यावतीने केले होते. प्रस्तुत स्पर्धेला राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून प्रचंड प्रतिसाद मिळाला .निबंध स्पर्धेसाठी ' सांविधानिक मूल्ये व वर्तमान स्थिती ' , ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मराठी भाषेचे स्थान ' , ' कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगिता व परिणाम ' असे तीन विषय देण्यात आले होते .या तीनही विषयांना राज्यभरातून प्रतिसाद मिळाला. परीक्षक म्हणून साहित्यिक , पत्रकार व माजी प्रकल्प अधिकारी डॉ. विलास ढवळे , मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. भारत कचरे यांनी अगदी पारदर्शकपणे मूल्यांकन केले .



**स्पर्धेचा निकाल**

**प्रथम पारितोषिक विजेती (रोख रक्कम रु. 5000 व सन्मानचिन्ह ) :**

■ कु .वैष्णवी विजय पवार ( बी .कॉम .प्रथम वर्ष सीए. ) श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, जि. अहिल्यानगर

**द्वितीय पारितोषिक विजेती ( रोख रक्कम रु. 3000 व सन्मानचिन्ह ) :**

■ कु. दहिफळे अक्षता संतोष (बी .एस्सी .प्रथम वर्ष ) कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धर्मापुरी जि. बीड

**तृतीय पारितोषिक विजेती (रोख रक्कम रुपये 2000 व सन्मानचिन्ह ) :**

■ कु. प्रगती बालाजी टाकणखार (बी.एस्सी. प्रथम वर्ष ) बहिर्जी स्मारक महाविद्यालय , वसमतनगर जि. हिंगोली

**उत्तेजनार्थ पारितोषिक विजेती (रोख रक्कम 1000 व सन्मानचिन्ह ) :**

■ कु. सलोनी साहेबराव जोंधळे (बी.एस्सी .द्वितीय वर्ष ) राजीव गांधी महाविद्यालय , मुदखेड जि. नांदेड .

**उत्तेजनार्थ पारितोषिक विजेती ( रोख रक्कम रुपये 1000 व सन्मानचिन्ह ) :**

■ कु. हामंद नंदिनी बालाजी (बी.एस्सी प्रथम वर्ष ) लालबहादूरशास्त्री महाविद्यालय , धर्माबाद जि. नांदेड .

वरील सर्व विजेत्यांना एका विशेष कार्यक्रमामध्ये पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे .तसेच विजेत्यांना भ्रमणध्वनीद्वारे कार्यक्रमाची तारीख कळविण्यात येईल.

# नैताळे येथे प्रामाणिकतेचा आदर्श : सापडलेला मोबाईल परत करत प्रभाकर घायाळ यांचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणाऱ्या एका प्रेरणादायी घटनेने नैताळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे. येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेत सेवक म्हणून कार्यरत असलेले प्रभाकर घायाळ यांनी रस्त्याच्या कडेला सापडलेला मोबाईल कोणताही स्वार्थ न बाळगता मूळ मालकिणीला परत करत प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या कृतीचे समाजमाध्यमांवर तसेच ग्रामस्थांतून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गाजवाडी-नैताळे मार्गावरील सोसायटी परिसरात कामावरून घरी जात असताना प्रभाकर घायाळ यांना एक मोबाईल रस्त्याच्या कडेला सापडला. मोबाईल



कोणाचा आहे किंवा त्याची किंमत किती आहे, याची कोणतीही माहिती नसतानाही त्यांनी तो सुरक्षित ठेवत मालकाचा शोध घेण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, काही वेळानंतर त्या मोबाईलवर दुसऱ्या क्रमांकावरून कॉल आला. कॉल स्वीकारल्यानंतर समोरून "माझा मोबाईल हरवला आहे" अशी माहिती देण्यात आली. त्यावर प्रभाकर घायाळ यांनी शांतपणे आपला परिचय देत संबंधित व्यक्तीस "मी घरी आहे, आपण येऊन मोबाईल घेऊन जावा," असे सांगितले.

त्यानंतर गाजरवाडी येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ सालके यांची मुलगी स्नेहल हिचा तो मोबाईल असल्याचे स्पष्ट झाले. स्नेहल ही अभियांत्रिकी शिक्षण घेत असून, ती स्कुटीवरून प्रवास करत असताना डिकीतून मोबाईल पडल्याने तो हरवला होता. मोबाईल हरवल्याचे लक्षात आल्यानंतर तिने दुसऱ्या मोबाईलवरून संपर्क साधला आणि अखेर तिचा मोबाईल सुरक्षित असल्याची खात्री झाली.

यानंतर स्नेहल हिने प्रत्यक्ष प्रभाकर घायाळ यांची भेट घेऊन मोबाईल ताब्यात घेतला. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल तिने मनःपूर्वक आभार व्यक्त केले. कोणत्याही प्रकारचा मोह न बाळगता केवळ प्रामाणिक भावनेतून त्यांनी केलेली ही कृती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

ही घटना समाजमाध्यमांवर प्रसारित होताच गावकऱ्यांनी प्रभाकर घायाळ यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या कृतीमुळे समाजात प्रामाणिकपणाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

दरम्यान, या घटनेतून विद्यार्थ्यांनी आणि प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे आवश्यक असल्याचा संदेशही मिळतो. अशा वस्तू मिळवण्यासाठी पालकांना मोठे कष्ट करावे लागतात, त्यामुळे जागरूकता अत्यंत गरजेची आहे.आजच्या काळात केवळ बाह्य आचरणापेक्षा प्रामाणिक वर्तन अधिक महत्त्वाचे ठरते, हे प्रभाकर घायाळ यांच्या कृतीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## ग्रामपंचायत दाभड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : अर्धापूर तालुक्यातील दाभड ग्रामपंचायत येथे भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करून संविधान मूल्यांची जनजागृती करण्यात आली. तसेच समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेड यांच्या मार्फत संविधान उद्देशिका वाटपाचा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला दाभड नगरीच्या लाडक्या सरपंच सौ. कांचन कुलदीप सूर्यवंशी, उपसरपंच अरविंद नारायणराव पांचाळ, ग्रामसेवक डी. एम. गमे, ग्रामपंचायत सदस्य राजेश माणिकराव टेकाळे, आकाश भगवानराव सूर्यवंशी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश दादजवार, दत्ता राजेगोरे, भीमराव टेकाळे, दीपक सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी गावातील प्रतिष्ठित बालाजीराव दवे,




नारायणराव सूर्यवंशी, सीताराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम माधवराव सूर्यवंशी, अमोल सूर्यवंशी, संदीप सूर्यवंशी, आरोग्य विभागाचे डॉ. विशाल गवळी, इंदुबाई सूर्यवंशी यांच्यासह अंगणवाडी सेविका वंदना सूर्यवंशी, ऋतिका सूर्यवंशी, रत्नमाला दवे, आम्रपाली सूर्यवंशी यांनी सहभाग नोंदवला.

तसेच जागृती महिला ग्रामसंघ दाभडच्या अध्यक्षा विमलबाई केशव सूर्यवंशी, सचिव सिमा राष्ट्रपाल सूर्यवंशी, कोषाध्यक्ष ममता अविनाश सूर्यवंशी, लिपिका (VO) शिल्पा गोतम रणिते, ग्राम सखी प्रेरिका भीमाताई तानाजी सावते व मालन पद्माकर ताटे यांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या १०; 'राणोजी' या दहाव्या वाघोबाची नोंद

● **कराड, प्रतिनिधी :**

पश्चिम महाराष्ट्रातील जैवविविधतेने समृद्ध असा महत्त्वाचा प्रदेश मानल्या जाणाऱ्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघसंख्येत उत्साहवर्धक वाढ झाली आहे. नुकत्याच नोंद झालेल्या 'रायबा' (एसटीआर-०७) आणि 'सरदार' (एसटीआर-०८) या प्रौढ वाघांनंतर आता 'राणोजी' (एसटीआर-१०) या नव्या वाघाची अधिकृत नोंद वन विभागाने केली आहे. त्यामुळे या क्षेत्रातील वाघांची एकूण संख्या आता १० वर पोहोचली आहे.

या दहामध्ये सात नर आणि तीन मादी वाघांचा समावेश असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली आहे. कॅमेरा ट्रॅप्स, पगमार्क्स आणि वैज्ञानिक विश्लेषणाच्या आधारे 'राणोजी'ची



ओळख निश्चित करण्यात आली आहे. सध्या 'राणोजी' राधानगरी परिसरात स्वतःची स्वतंत्र हद्द (टेरिटरी) निर्माण करत असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे.

सावंतवाडी-दोडामार्ग ते राधानगरी हा नैसर्गिक वन्यजीव कॉरिडॉर वाघांच्या मुक्त संचारासाठी महत्त्वाचा ठरत असून, त्यामुळे त्यांची जनुकीय विविधता जपली जात आहे आणि दीर्घकालीन संवर्धनाला बळ मिळत आहे.

## दर्यापूरात एकतेचे दर्शन: विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस सर्वपक्षीयांकडून हारअर्पण करून जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे, तालुका प्रतिनिधी, दर्यापूर** : विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त दर्यापूर नगर परिषद पार्क येथे आज सकाळी सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते एका व्यासपीठावर आले. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत महामानवाला अभिवादन केले.

नगरसेवक रोशन कट्यारमल, सांगळुदचे उपसरपंच शरद आठवले, रिपाई तालुका अध्यक्ष अनिल गवई, भीम क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुरेश भटकर यांच्यासह काँग्रेस, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी व इतर पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी 'जय भीम' आणि 'भारतीय राज्यघटना अमर रहे'च्या घोषणांनी संपूर्ण पार्क परिसर दुमदुमून गेला.

उपसरपंच शरद आठवले म्हणाले, "बाबासाहेब हे फक्त एका समाजाचे नाहीत, ते संपूर्ण देशाचे आहेत. त्यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र आजही आम्हाला दिशा देतो. आज सर्वपक्षीय नेते एकत्र आले, हीच बाबासाहेबांच्या समतेच्या विचारांची ताकद आहे."नगरसेवक रोशन कट्यारमल यांनी भावना व्यक्त केल्या, "बाबासाहेबांच्या संविधानामुळेच आम्हाला नगरसेवक म्हणून काम करण्याचा अधिकार मिळाला. त्यांचे विचार दर्यापूरच्या विकासाचा पाया आहेत."रिपाई तालुका अध्यक्ष अनिल गवई म्हणाले, "भीमजयंती हा उत्सव नाही, ही चळवळ आहे. शिक्षण आणि स्वाभिमानाच्या मार्गावर चालण्याची आज पुन्हा शपथ घेऊया."भीम क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुरेश भटकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, "बाबासाहेबांनी अन्यायाविरुद्ध क्रांतीचा लढा उभारला. आजही गावागावात संविधान साक्षरता पोहोचवणे, बौद्ध विहारांचे सक्षमीकरण करणे आणि युवकांना चळवळीशी जोडणे हीच भीम क्रांती संघटनेची भूमिका आहे. बाबासाहेबांचे विचार हे केवळ पुस्तकात नाही, तर कृतीत उतरले पाहिजेत."

कार्यक्रमाला महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक व शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सांगता झाली. राजकीय एकोपा आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवणाऱ्या या जयंती सोहळ्याची दर्यापूर शहरात दिवसभर चर्चा होती.

# पालखी सोहळ्याचा पुणे मुक्कामाचा निर्णय लांबणीवर

● पुणे, प्रतिनिधी :



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्याचा पुणे येथील भवानी पेठ मंदिर मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर पडला आहे. मुक्काम इतरत्र हलविणे वा सध्याच्या जागेतील उपाय योजनांबाबत ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव अद्याप कुणाकडून आला नसल्याने आळंदी देवस्थानने याबाबतचा निर्णय पुढे ढकलला आहे. येत्या १ मे रोजी यावर अधिकृत निर्णय घेऊ, असे देवस्थानने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून स्पष्ट केले आहे.

भवानी पेठ मुक्काम ठिकाणी सोयी, सुविधांबाबत देवस्थानकडून स्थानिक लोकप्रतिनिधी, भवानी पेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. त्यात योग्य त्या उपाययोजना देवस्थानतर्फे सुचविण्यात आल्या.

मात्र, १२ एप्रिलपर्यंत मुक्कामाबाबत ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव आलेला नाही. त्यामुळे प्रशासन, लोकप्रतिनिधी, भवानीपेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त, दिंडी संघटना पदाधिकारी, श्रीगुरू हैबतरावबाबा यांचे वंशज प्रतिनिधी, श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार यांची संयुक्त बैठक प्रशासनाच्या वतीने पुढील ८ दिवसांत आयोजित करण्यात येणार आहे.

**वेळापत्रक लांबले...**

आळंदी देवस्थानतर्फे पालखी भवानी पेठ मंदिर मुक्कामाबाबतचा निर्णय रविवारी घेण्यात येणार होता व त्यानंतर अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात येणार होते. मात्र, हा निर्णय लांबल्याने अधिकृत मुक्काम नमूद करून प्रिंट स्वरूपातील वेळापत्रक जाहीर करण्यास वेळ लागणार असल्याचे सांगण्यात आले.

# मूकबधिर मुलांच्या हास्यात उमलला 'भीमराव' कीर्तीचा प्रकाश

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून अनोखे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक**

**नागपूर विभाग** : भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर उपेक्षितांच्या कल्याणासाठी आणि ज्ञानाच्या प्रसारासाठी संघर्ष केला. त्यांच्या याच विचारांचा वारसा जपत, महावितरणच्या महाल विभाग तसेच तुळशीबाग-नंदनवन उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले आहे. बाबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून सोमवारी स्थानिक तुळशीबाग येथील 'कल्याण मूकबधिर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया'तील विशेष विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि भोजन दान करून एक आगळावेगळा 'सेवा उत्सव' साजरा करण्यात आला.



केवळ औपचारिकता म्हणून जयंती साजरी न करता, ज्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदतीची गरज आहे, अशा मूकबधिर विद्यार्थ्यांसोबत हा आनंद वाटून घेण्यात आला. कार्यक्रमादरम्यान जेव्हा या चिमुकल्यांच्या हातात शैक्षणिक साहित्याचे संच देण्यात आले, तेव्हा त्यांच्या बोलक्या डोळ्यांतील चमक आणि चेहऱ्यावरील निरागस हास्य पाहून उपस्थितही भावूक झाले होते. शब्दांविना व्यक्त होणाऱ्या त्या कृतज्ञतेने वातावरणात एक वेगळीच संवेदनशीलता भरून आली होती.

हा उपक्रम महाल विभागाचे कार्यकारी अभियंता समीर टेकाडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता पराग उके आणि धीरज बारापात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी बोलताना अधिकाऱ्यांनी व्यक्त केले की, "बाबासाहेबांना अपेक्षित असलेली खरी श्रद्धांजली ही केवळ भाषणांतून नाही, तर कृतीतून आणि वंचितांच्या सेवेतून मिळते. या मुलांच्या आनंदात सहभागी होता आले, हे आमचे भाग्य आहे."

या स्तुत्य उपक्रमासाठी महावितरणच्या महाल विभाग आणि तुळशीबाग-नंदनवन उपविभागातील कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रमाला सहाय्यक अभियंता वाकडे, बागडे आणि रामटेके यांच्यासह महावितरणचे अन्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. केवळ वीजपुरवठा सुरळीत ठेवणे हीच आमची जबाबदारी नसून, समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व निभावणे हे देखील आमचे कर्तव्य असल्याचे या निमित्ताने महावितरण परिवाराने सिद्ध केले आहे.

# पुस्तकांचा उत्सव : वाचन, विचार आणि संस्कृतीचा सेतू



कल्पना पांडे

जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन हा दरवर्षी २३ एप्रिल रोजी जगभरात साजरा केला जातो. युनेस्कोने १९९५ मध्ये स्थापित केलेल्या या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट वाचनाची आवड, प्रकाशन आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी कॉपीराइटचे महत्त्व वाढवणे हे आहे. या दिवशी शिक्षण, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि वैयक्तिक विकासासाठी पुस्तकांची भूमिका अधोरेखित केली जाते. लोकांना वाचनाचा आनंद आणि कथाकथनासाठी प्रोत्साहन दिले जाते. लेखकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीतील अमूल्य योगदानाचा गौरव केला जातो, कॉपीराइट कायद्यांची जागरूकता वाढवली जाते जेणेकरून लेखकांना योग्य मोबदला मिळावा आणि त्यांची मूळ रचना चोरीपासून वाचवली जावी. पुस्तके पिढ्यान्पिढ्या आणि संस्कृतींमधील पूल बांधून वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील कल्पनांचा शोध घेण्याची संधी देतात.

हा दिवस २३ एप्रिल रोजीच साजरा करण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या दिवसाची सुरुवात स्पेनमधील कॅटलोनियातून झाली असून, तेथे २३ एप्रिल हा संत जॉर्जचा दिवस (दि दा द सँत जॉर्डी) म्हणून ओळखला जातो. येथे प्राचीन परंपरेनुसार प्रेमासाठी गुलाब आणि शाश्वततेसाठी पुस्तकांची देवाणघेवाण केली जाते. कॅटलोनियन परंपरा म्हणजे स्पेनातील कॅटलोनिया प्रदेशात २३ एप्रिल रोजी साजरा होणारा ‘दि दा द सँत जॉर्डी’ (Dia-da de Sant Jordi) किंवा ‘डिया देल लिब्रे इ दे ला रोजा’ (पुस्तकं व गुलाबांचा दिवस) हा उत्सव, जो संत जॉर्ज (Sant Jordi) या कॅटलोनियाच्या संरक्षक संताच्या स्मृतीत साजरा केला जातो. या परंपरेची सुरुवात मध्ययुगीन काळात झाली असून, त्यामागे एक प्रसिद्ध कथा आहे: कॅटलोनियातील मॉंटब्लँक या छोट्या गावात एक भयंकर ड्रॅगन रहिवाशांना त्रास देत होता आणि दररोज एक व्यक्तीला बलिदान म्हणून दिले जात असे. एकदा राजकन्येची पाळी आली, तेव्हा संत जॉर्जने ड्रॅगनशी लढा दिला, त्याला मारले आणि त्याच्या रक्तातून एक लाल गुलाबाची झाडी उगवली. संत जॉर्जने त्या गुलाबाची फुलं काढून राजकन्येला दिली, ज्यामुळे प्रेम आणि शौर्याचे प्रतीक म्हणून लाल गुलाबाची परंपरा निर्माण झाली. या कथेनुसार, दरवर्षी एप्रिल महिन्यात गुलाब फुलतात. या दिवशी पारंपरिकरीत्या पुरुष आपल्या प्रिय स्त्रियांना (पत्नी, आई, मुलगी किंवा सहकारींना) लाल गुलाब देतात, तर स्त्रिया पुरुषांना पुस्तक देतात – पुस्तक हे ज्ञान, संस्कृती आणि शाश्वततेचे प्रतीक मानले जाते. आधुनिक काळात ही देवाणघेवाण दोन्ही लिंगांसाठी समान झाली आहे आणि मित्र-मैत्रिणींमध्येदेखील पुस्तके-गुलाबांची अदलाबदल केली जाते. गुलाबांना कॅटलोनियन ध्वजाच्या रंगांच्या रिबनने (लाल-पिवळे) बांधले जाते आणि त्यासोबत गव्हाची कणगी जोडली जाते.

पुस्तकांची परंपरा १९२०-३० च्या दशकात सुरू झाली; १९२६ मध्ये बार्सेलोनातील एका पुस्तक विक्रेत्याने मिगेल द सर्व्हान्तेसच्या स्मृतीत पुस्तक देण्याचा प्रस्ताव दिला आणि तो कॅटलोनियात अधिक लोकप्रिय झाला, ज्यामुळे तो कॅटलोनियन सांस्कृतिक ओळख आणि भाषेच्या संरक्षणाशी जोडला गेला. आज कॅटलोनियातील रस्ते, विशेषतः बार्सेलोनामध्ये, पुस्तक आणि गुलाबांच्या स्टॉल्सने भरलेले असतात; दरवर्षी सरासरी ४० लाख गुलाब आणि ५ लाख पुस्तके विकली जातात. हा दिवस कॅटलोनियन व्हॅलेंटाइन डे म्हणून ओळखला जातो, ज्यात प्रेम, साहित्य आणि सांस्कृतिक अभिमान एकत्र येतात.

दुसरे देखील एक प्रतीकात्मक महत्त्व आहे, याच तारखेला १६१६ मध्ये मिगेल द सर्व्हान्तेस, विल्यम शेक्सपिअर आणि इंका गार्सिलासो द ला वेगा यांसारख्या प्रमुख लेखकांचा मृत्यू किंवा जन्मदिन साजरा होतो, तसेच मॉरिस द्रुओ, हल्डोर के. लॅक्सनेस, व्लादिमीर नाबोकोव आणि मॅन्युएल मेजिया व्हॅलेजो यांसारख्या इतर नामवंत लेखकांचाही जन्म किंवा स्मृतिदिन याच दिवशी येतो. नोव्हेंबर १९९५ मध्ये फेडेरिकोचे महापौर यांनी प्रकाशक लोकशाहीचे अध्यक्ष पेरे व्हिसेन्स यांना पत्र पाठवून कळवले की, २३ एप्रिल हा जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिवस” म्हणून जाहीर करण्यात आले आहे. याच परंपरेने युनेस्कोला प्रेरणा दिली आणि २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक उत्सवाची सुरुवात झाली.

२३ एप्रिल १९९६ हा दिवस विशेष ठरला जेव्हा आंतरराष्ट्रीय प्रकाशक संघटनेच्या १००व्या वर्धापनदिनी बार्सिलोना येथे परिषद आयोजित करण्यात आली होती आणि त्याच दिवशी “जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन” प्रथमच प्रकाशित करण्यात आले. युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय पुस्तक उद्योग संघटनांद्वारे दरवर्षी एक शहर ‘वर्ल्ड बुक कॅपिटल’ म्हणून नियुक्त केले जाते ज्यामुळे वर्षभर स्थानिक उपक्रम राबवले जातात; २०२४ वर्षी स्ट्रासबर्ग (फ्रान्स), २०२५ साली रियो द जनेरो (ब्राझील) आणि २०२६ साली रबात (मोरोक्को) ही शहरे निवडण्यात आली आहेत. जागतिक पुस्तक दिन हा वाचनसंस्कृतीचा उत्सव आहे.

पुस्तक हे केवळ ज्ञानसंचयाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. एका भाषेत जन्मलेले विचार जेव्हा दुसऱ्या भाषेत पोहोचतात, तेव्हा ज्ञानाची सीमा विस्तारते. ही सीमोल्लंघनाची प्रक्रिया म्हणजे भाषांतर. पुस्तक आणि भाषांतर यांचे नाते हे ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने अतूट आहे. हा दिवस केवळ साजरा करण्यासाठी नव्हे तर वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आणि पुस्तकांशी आपली जवळीक वाढवण्यासाठी आहे. साहित्यपरंपरेचा गौरव आणि जागतिक स्तरावर लेखकांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी ही तारीख प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जाते. युनेस्को, पुस्तक प्रकाशक, विक्रेते, ग्रंथालये आणि शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून या दिवशी पुस्तक मेळे, वाचन सत्रे, लेखक-भेटी, पुस्तक दान, कथा-कविता वाचन, साहित्य स्पर्धा आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात. सोशल मीडियावर #WorldBookDay सारखे हॅशटॅग वापरून वाचक आपली आवडती पुस्तके शेअर करतात.

जगातील अनेक श्रेष्ठ साहित्यकृती आपण आपल्या मातृभाषेत वाचू शकतो, याचे श्रेय भाषांतराला जाते. म्हणून भाषांतरकार हा दोन संस्कृतींना जोडणारा सर्जनशील दुवा असतो आणि उत्कृष्ट भाषांतर ही स्वतःमध्ये एक स्वतंत्र साहित्यकृती ठरते. जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने हे भाषांतरकारांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे, कारण ते वाचन संस्कृतीला जागतिक स्तरावर जोडते आणि पुस्तकांना खऱ्या अर्थाने ‘पिढ्यान्पिढ्या आणि संस्कृतींमधील पूल’ बनवते. विल्यम शेक्सपिअर यांची नाटके, लिओ टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्या, फ्योदोर दोस्तोवस्की यांचे मानसशास्त्रीय लेखन किंवा गॅब्रिएल गार्सिया मार्केझ यांचा जादुई वास्तववाद — हे सर्व आपण आपल्या भाषेत अनुभवू शकतो. भाषांतरामुळे साहित्य खऱ्या अर्थाने जागतिक बनते आणि संस्कृतींमधील सीमारेषा मिटवते; ज्यामुळे वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील जग, विचार आणि भावना समजतात. भारतीय संदर्भात भाषांतराचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते, कारण बहुभाषिक भारतात ते ज्ञान, संस्कृती आणि सामाजिक जागृतीचा पूल बनते. रवींद्रनाथ टागोर यांनी स्वतःच्या रचनांचे भाषांतर करून भारतीय साहित्याला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली; प्रेमचंद यांच्या कथा सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब विविध भारतीय भाषांमध्ये दिसते. मराठी साहित्यात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर आणि शिवाजी सावंत यांच्या साहित्यकृती इतर भाषांमध्ये उपलब्ध झाल्यामुळे मराठी विचारविश्व अधिक व्यापक आणि प्रभावी झाले आहे.

स्त्री साहित्यिकांच्या लेखनानेही समाजमनाला नवी दिशा दिली आहे; इस्मत चुगताई यांच्या लेखनाने स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न ठळक केला, महाश्वेता देवी यांनी वंचित घटकांचे प्रश्न मांडले, तर मराठीत गौरी देशपांडे यांच्या साहित्याने स्त्रीमनाचे सूक्ष्म चित्रण केले. या साहित्यकृतींचे विविध भाषांतील भाषांतर झाल्यामुळे स्त्रीवादी विचार व्यापक समाजापर्यंत पोहोचले आणि लिंगसमानतेच्या चळवळीला बळ मिळाले. वीणा गवाणकर यांनी १९७९ मध्ये लिहिलेल्या ‘एक होता कार्व्हर’ या पहिल्या चरित्रकथनाने मराठी साहित्यात क्रांती घडवली; अमेरिकन कृषिविद् जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित हे पुस्तक १८ हून अधिक आवृत्त्या प्रकाशित झाले आणि विद्यार्थी, शेतकरी, शिक्षक ते सामाजिक कार्यकर्ते यांना प्रेरित करत राहिले. हे कार्य भाषांतर आणि पुनर्कथन यांच्या माध्यमातून ज्ञानसमृद्धी घडवणारे आहे.

सामाजिक आणि कायदेविषयक साहित्याच्या दृष्टीनेही भाषांतर महत्त्वपूर्ण आहे. रशियन भाषांतरित पुस्तकांनी विविध भाषांतील जगभरातील लाखो वाचकांना मानवी मनाच्या गहन खोल्यांचा, समाजव्यवस्थेच्या जटिलतेचा आणि जीवनातील सत्यांचा अनुभव घेण्याची अनमोल संधी दिली आहे. ही पुस्तके वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील कल्पना, भावना आणि विचारांच्या दुनियेत घेऊन जातात. रशियातील १९व्या शतकातील सामाजिक-राजकीय वातावरण, मानवी संघर्ष आणि नैतिक प्रश्न आजही भारतीय वाचकांना इतके जवळचे वाटतात की, भाषांतर झाल्यावरही ते ‘आपले’ वाटतात. या पुस्तकांमुळे आपण केवळ रशियन संस्कृती समजून घेत नाही, तर स्वतःच्या आयुष्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहू शकतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानविषयक लेखन, सामाजिक न्यायावरील भाष्य आणि भाषणे विविध भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव सर्व स्तरांवर जाणवतो. भारतीय राज्यघटना आणि कायदे विषयक पुस्तके मातृभाषेत उपलब्ध झाल्यामुळे सामान्य नागरिकांनाही आपल्या अधिकारांची जाणीव होते आणि लोकशाही अधिक मजबूत बनते.

भारतामध्येही या दिवसाला विशेष महत्त्व आहे. नॅशनल बुक ट्रस्ट द्वारे राज्य ग्रंथालये, शाळा आणि विविध साहित्यिक संस्थांमार्फत वाचन प्रेरणा दिन म्हणून अनेक उपक्रम राबवले जातात. पुस्तक प्रदर्शने, लेखक-वाचक भेटी, कथा-कविता स्पर्धा, सामूहिक वाचन सत्रे आणि ‘दिवसाला एक पुस्तक’ यांसारखी वैयक्तिक आव्हाने यामुळे वाचनाची सवय दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रातही ग्रंथालय चळवळ आणि साहित्यसंमेलने यांच्या माध्यमातून पुस्तकांबद्दलची जिव्हाळ्याची परंपरा जपली जाते.

तथापि, वाचनसंस्कृतीसमोर काही गंभीर आव्हानेही उभी आहेत. डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, सोशल मीडियामुळे कमी होत चाललेले लक्षवेधक कालावधी, महागडी पुस्तके, ग्रामीण भागात ग्रंथालयांची अपुरी उपलब्धता, तसेच कॉपीराइट उल्लंघनामुळे लेखक आणि प्रकाशकांचे होणारे आर्थिक नुकसान ही काही प्रमुख अडचणी आहेत. ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्स ही नवी साधने असली तरी त्यातून पारंपरिक वाचनाची सवय कमी होण्याची भीतीही व्यक्त होते. त्यामुळे पुस्तकप्रेमी, शिक्षक, पालक आणि धोरणकर्ते यांनी मिळून वाचनसंस्कृती टिकवण्याचे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. आज डिजिटल युगात ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्समुळे भाषांतराचे क्षेत्र अधिक विस्तारले आहे. जागतिक साहित्य एका क्लिकवर उपलब्ध होत आहे.

अशा काळात भाषांतराचे महत्त्व अधिक वाढले आहे. पुस्तक दिन हा केवळ वाचनाचा नव्हे, तर विविध संस्कृतींना जोडणाऱ्या ज्ञानसेतूचा उत्सव आहे.

वैयक्तिक पातळीवर हा दिवस साजरा करणे अत्यंत सोपे आहे. एखादे आवडते पुस्तक हातात घेऊन काही वेळ शांतपणे वाचन करणे, कुटुंबासोबत सामूहिक वाचन करणे, जवळच्या ग्रंथालयाला भेट देणे, मित्रांना एखादे चांगले पुस्तक सुचवणे किंवा स्वतः सुंदर बुकमार्क तयार करणे अशा छोट्या कृतीतूनही मोठा संदेश देता येतो. वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती विचारांना चालना देणारी, संवेदनशीलता वाढवणारी आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी सर्जनशील कृती आहे. जागतिक पुस्तक दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा आणि वाचनाशी नाते दृढ करण्याचा दिवस आहे.

पुस्तकांच्या माध्यमातून आपण केवळ ज्ञानसंपदा नव्हे तर अनुभव, संस्कृती आणि मूल्यांची परंपरा पुढील पिढीकडे पोहोचवू शकतो. यंदा २३ एप्रिल रोजी तुम्ही कोणते पुस्तक वाचणार आहात, हा प्रश्न स्वतःला विचारण्याची आणि त्याचे कृतीत उत्तर देण्याची हीच योग्य वेळ आहे. म्हणूनच या पुस्तक दिनी आपण अधिकाधिक वाचन करण्याचा संकल्प करूया. विविध भाषांतील साहित्याचा आस्वाद घेऊया. लेखक आणि भाषांतरकार यांच्या योगदानाची कदर करूया. कारण पुस्तक आणि भाषांतर यांचे नाते हे मानवतेला जोडणारे, विचारांना दिशा देणारे आणि समाजाला समृद्ध करणारे आहे.

प्रसिद्ध जर्मन लेखक हर्मन हेस त्यांच्या ‘द मॅजिक ऑफ द बुक’ या लिखाणात म्हणतात की, ‘माणसाने स्वतःच्या बुद्धीने निर्माण केलेल्या जगांमध्ये पुस्तकांचे जग सर्वात मोठे आहे. एखादे मूल जेव्हा प्रथम अक्षरे लिहायला आणि वाचायला शिकते, तेव्हा ते एका गुंतागुंतीच्या आणि कृत्रिम जगात प्रवेश करते. शब्द, लेखन आणि पुस्तके नसती, तर इतिहासच अस्तित्वात आला नसता आणि मानवतेची संकल्पनाही निर्माण झाली नसती.’

यूनेस्कोच्या शब्दांत– ‘पुस्तके ही विचारांची देवाणघेवाण करण्यासाठीची सर्वात सुंदर निर्मिती असून दारिद्र्याविरुद्ध लढा देण्यासाठी आणि शाश्वत शांतता निर्माण करण्यासाठी प्रभावी साधन आहेत’. आजच्या काळात या विधानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

